# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२५९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि.११ नोव्हेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## न्यायमूर्ती संजीव खन्ना देशाचे नवे सरन्यायाधीश

### राष्ट्रपती भवनात पार पडला शपथविधी
### राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दिली शपथ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नवी दिल्ली**

देशाच्या इतिहासातील आजचा दिवस अत्यंत महत्त्वाचा आहे. आज देशाला नवे सरन्यायाधीश मिळाले आहेत. आज न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी देशाचे ५१ वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतली. राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संजीव खन्ना यांना सरन्यायाधीश पदाची आणि गोपनीयतेची शपथ दिली.



संजीव खन्ना १३ मे २०२५ रोजी निवृत्त होणार आहेत, त्यांना सरन्यायाधीश पदावर कार्यरत राहण्यासाठी फक्त सहा महिन्यांचा अवधी मिळणार आहे. १९८३ मध्ये कायद्याचा सराव सुरू करणारे न्यायमूर्ती संजीव खन्ना २००५ मध्ये दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश झाले. त्यानंतर जानेवारी २०१९ मध्ये त्यांची सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांना फौजदारी, दिवाणी, कर आणि घटनात्मक कायद्यातील एक उत्तम तज्ज्ञ मानले जातात.

**न्यायमूर्ती संजीव खन्ना यांच्यानंतर आणखी कोण?**

न्यायमूर्ती संजीव खन्ना यांच्यानंतर पुढील सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांच्या नावाची चर्चा आहे. ते मे २०२५ मध्ये पदभार स्वीकारू शकतात. भूषण रामकृष्ण गवई सरन्यायाधीश झाल्यास ते दुसरे मागासवर्गीय सरन्यायाधीश ठरतील. तेही सरन्यायाधीश म्हणून सहा महिने पदावर राहतील. त्यांच्यानंतर न्यायमूर्ती सूर्यकांत हे सरन्यायाधीश होण्याची शक्यता आहे.

## माझे घर नागपूरच, अद्याप मुंबईत स्वत:चे घर नाही

### फडणवीस यांची दक्षिण-पश्चिमच्या मतदारांना भावनिक साद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नागपूर**

मी इतकी वर्षे आमदार आहे, मुख्यमंत्री होतो, आज उपमुख्यमंत्री आहे पण अजूनही माझे मुंबईत स्वत:चे घर नाही. दक्षिण-पश्चिम नागपूर हेच माझे घर आहे, अशी भावनिक साद उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मतदारांना घातली आणि सभेतील सगळ्यांनीच टाळ्यांचा कडकडाट केला. फडणवीस हे सहाव्यांदा या मतदारसंघातून लढत आहेत. चढत्या मताधिक्याने ते दरवेळी विजयी झाले आहेत. कोणत्याही पदावर असलो, तरी दक्षिण-पश्चिमशी असलेली नाळ कधीही तुटू दिली नाही, कोणत्याही जातीपातीच्या माणसांची कामे केली आणि म्हणूनच सर्वांनी आजवर विश्वास टाकला, असे म्हणत त्यांनी यावेळी भरघोस मताधिक्याने विजयी करण्याचे मतदारांना आवाहन केले.



राज्याच्या विविध भागांमध्ये देवेंद्र फडणवीस हे सध्या प्रचारसभांसाठी फिरताना दिसत आहेत. भाजप व महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार करण्यासाठी त्यांचे विविध जिल्ह्यात दौरे सुरु आहेत. रविवारी त्यांनी नागपुरात आपल्या मतदारसंघात सभा घेतली. सभेला प्रचंड गर्दी झाली. त्यावेळी त्यांनी भावना व्यक्त केली. माझी स्वत:ची कोणतीही संस्था नाही, कॉलेज नाही, मी नेहमीच लोकांचा विचार केला. इतके मुख्यमंत्री आजवर महाराष्ट्राने पाहिले पण मुंबईत स्वत:चे घर नसलेला मी एकच मुख्यमंत्री आहे, असे ते म्हणाले.






## वणी हेलिपॅडवर उद्धव ठाकरे, मिलिंद नार्वेकरांच्या बॅगांची तपासणी; ठाकरे संतापले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११वणी**

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्यात विधानसभा निवडणुकांसाठी प्रचारसभांना सुरुवात केली आहे. उद्धव ठाकरे यांची आज वणी येथे सभा होत आहे. या सभेसाठी ठाकरे हेलिकॉप्टरने गेले आहेत, यावेळी हेलिपॉडवर उतरताच ठाकरे आणि मिलिंद नार्वेकर यांची बॅग निवडणूक अधिकाऱ्यांना तपासल्याचे समोर आले आहे. दरम्यान, यानंतर सभेत उद्धव ठाकरे संतापल्याचे पाहायला मिळाले. यावेळी त्यांनी महायुतीवर जोरदार निशाणा साधला.



माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्यात विधानसभा निवडणुकांसाठी प्रचारसभांना सुरुवात केली आहे. उद्धव ठाकरे यांची आज वणी येथे सभा होत आहे. या सभेसाठी ठाकरे हेलिकॉप्टरने गेले आहेत, यावेळी हेलिपॉडवर उतरताच ठाकरे आणि मिलिंद नार्वेकर यांची बॅग निवडणूक अधिकाऱ्यांना तपासल्याचे समोर आले आहे. दरम्यान, यानंतर सभेत उद्धव ठाकरे संतापल्याचे पाहायला मिळाले. यावेळी त्यांनी महायुतीवर जोरदार निशाणा साधला.

सभेत बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, मी हेलिकॉप्टरने आलो तेव्हा आठ, दहा जण माझ्या स्वागतासाठी आले होते. म्हटलं काय करायचं आहे. ते म्हणाले, बॅग तपासायची आहे, मी म्हणालो तपासा. त्यांचा व्हिडीओ काढला आहे. एक लक्षात घ्या तुम्हाला कुठेही चौकशीसाठी किंवा तपासणीसाठी अडवले तर त्यांचीही चौकशी करा. ते कुठे नोकरीला आहेत हे तपासा. जसे ते आपले खिसे तपासतात तसे त्यांचेही तुम्ही खिसे तपासा कारण हा आपला अधिकार आहे, असंही उद्धव ठाकरे म्हणाले.

मी यंत्रणेला सांगत आहे की मी अजिबार रागावलो नाही. तुम्ही तुमच काम करताय, मी माझ काम करतोय. यानंतर मी त्याला म्हणालो मोदी आणि शाहांची बॅग तपासली का? एकनाथ शिंदे, अजित पवार, देवेंद्र फडणवीस यांची बॅग तपासायला हवी की नको?, असा सवाल करत टोलाही लगावला.

**उद्धव ठाकरेंची शिंदे गटावर टीका**

महाराष्ट्राचा इतिहास आहे. महाराष्ट्र कधीही गद्दारांना क्षमा करत नाही. त्यांना हेच सांगायचे आहे की, त्यांनी गुवाहाटीचा डोंगर बघितला, पण त्यांनी रायगडावरचे टकमक टोक बघितले नाही. ते त्यांना २३ तारखेला दाखवायचे आहे. रेल्वेत कुणाची ओळख असेल तर त्यांनी २३ तारखेचे गुवाहाटीचे तिकीट काढून द्यावे, कारण एकाला तिकडे पाठवायचे आहे. मग त्यांनी तिथे झाडे, डोंगर मोजत बसावे, असा खोचक टोला उद्धव ठाकरे यांनी शहाजीबापू यांचे नाव न घेता लगावला.

## केस नसतांना डोक्यावरून कंगवा फिरवणारे खूप

### गडकरींचा मुख्यमंत्रिपदावरून मविआच्या नेत्यांना चिमटा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११मुंबई**

महाविकास आघाडीतील मुख्यमंत्रिपदासाठी इच्छुक असलेल्या नेत्यांना केंद्रीय मंत्री नितीन गडकरींनी चिमटा काढला. केस नसताना डोक्यावर कंगवा फिरवणारे खूप लोक असतात, असे गडकरी म्हणाले. महाविकास आघाडीला बहुमतच मिळणार नाही, असे राजकीय भाकितही नितीन गडकरींनी केले.




एबीपी माझा या वृत्तवाहिनीला नितीन गडकरींनी मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी महाविकास आघाडीतील अंतर्गत कलहावर सूचक भाष्य केले.

काँग्रेस आणि ठाकरेंच्या शिवसेनेमध्ये मुख्यमंत्रिपदावरून जोरदार दावेदारी सुरू आहे, तुम्ही याकडे कसं बघता? असा प्रश्न नितीन गडकरींना विचारण्यात आला होता. त्याला उत्तर देताना नितीन गडकरींनी महाविकास आघाडीला टोला लगावला.

**सिनेमा आला होता, थांब टकल्या भांग पाडते**

नितीन गडकरी म्हणाले, नाही, त्यांच्या दावेदारीत काही अर्थ नाही. असं प्रत्येक जण दावेदारी करत असतो. एक सिनेमा आला होता, 'थांब टकल्या भांग पाडते'. केस नसताना डोक्यावर कंगवा फिरवणारे खूप लोक आहेत. नाना (नाना पटोले) त्यातले आहेत, असं मला म्हणायचं नाही.

**महाविकास आघाडी ही सर्कस आणि शरद पवार रिंगमास्टर**

गडकरी पुढे म्हणाले, आता सध्या आघाडीमध्ये खूप मुख्यमंत्री आहेत. काही सुप्त आहेत, काही अतृप्त आहेत. काही दिसतात, काही दिसत नाहीत. पण, ही खरी सर्कस आहे आणि या सर्कसीमध्ये रिंगमास्टर आहेत शरद पवार. ते आहेत म्हणून ही सर्कस टिकून आहे, असे गडकरी म्हणाले.

शरद पवार ज्या दिवशी थांबतील, एक मिनिटातं डौलारा खाली पडेल. त्यामुळे त्यांनी सांभाळून ठेवलं आहे. त्यामुळे सध्यातरी जोपर्यंत निवडणूक होत नाही... पहिलं तर बहुमतच मिळणार नाही. मिळाली तर हे बनतील अशी शक्यता नाही. तोपर्यंत प्रत्येकाने मनात आनंद घेतला की, मी होणार आहे. तर तेवढे दिवस त्यांना आनंद घेऊ द्या, असा चिमटा नितीन गडकरींनी महाविकास आघाडीतील मुख्यमंत्रिपदासाठी असलेल्या इच्छुकांना काढला.

## भिंत पोस्टर्स रंगविणे पडले मागे मोबाइलवर प्रचाराचा धुरळा

### हायटेक निवडणूक : 'होम टू होम'लाही उमेदवार, कार्यकर्त्यांचे प्राधान्य

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

पूर्वी कोणतीही निवडणूक म्हटले की, हॅण्डबिल, मोठे कागदी पोस्टर्स, भोंगे, रंगवलेल्या भिंती, बिल्ले असे प्रचाराचे माध्यम असायचे. जो-तो राजकीय पक्ष विविध रंगांनी आपल्या प्रचारासाठी गावातील भिंती रंगवायचा; परंतु आज ही परिस्थिती राहिलेली नाही. सध्या ना भिंती रंगवायची गरज, ना कुठे फारसे भोंगे लावायची गरज आहे.आज थेट इंटरनेटद्वारे, व्हॉट्सॲप, - इन्स्टाग्राम, फेसबुक आदी डिजिटल माध्यमांचा सुकाळ आहे.

थेट मतदारांच्या मोबाइलवर प्रचाराचा धुरळा उडालेला पाहायला मिळत आहे. कोणत्याही राजकीय निर्बंधांशिवाय राजकीय पक्षांना जनतेशी त्वरित संपर्क साधण्यासही मदत होते.इन्स्टाग्राम किंवा एक्स मीडियासारखे अनेक प्लैटफॉर्म विशिष्ट कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचत असल्याने त्याचे स्वरूपही वेगळे असते. मीडियासारखे मेसेज पोहोचविणारे प्लॅटफॉर्म मतदारांवर प्रभाव टाकण्याचे माध्यम ठरत आहेत.२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत राजकीय पक्ष त्यांच्या पक्षाचा प्रचार करण्यासाठी आणि मतदारांचा पाठिंबा मिळवण्यासाठी सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणावर वापर करताना दिसून येत आहेत. सत्ताधारी पक्ष जनतेसाठी राबविलेल्या योजनांचे मेसेज पाठवून मतदारांना पक्षाशी व नेत्याशी जोडण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दृश्य आहे.

**राजकीय हालचाली वेगात**

येत्या २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीसाठी मतदान घेतले जाणार आहे. सध्या डोअर टू डोअर, सभा, रॅलीने प्रचार सुरू झाल्याने राजकीय हालचाली गतिमान झाल्या आहेत. विधानसभा निवडणुकीत कोण निवडून येतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**मोबाइल हेच प्रचाराचे माध्यम**

व्हॉट्सॲप, सोशल मीडियामुळे राजकीय पक्ष व कार्यकर्त्यांना उमेदवाराचा व्हॉट्सॲप ग्रुपमधून मतदारांशी जलद आणि चांगल्याप्रकारे संवाद साधणे सोपे झाले आहे. मोठ्या वापरकर्त्यांना त्याची कामगिरी झटपट हायलाईट करण्यात व मतदारांवर प्रभाव टाकण्यास मदत होऊ लागली. सोबत असलेले निष्ठावान पदाधिकारी बोलण्यास सांगत आहेत.

## 'आमच्याशिवाय कोणतेही सरकार चालणार नाही आम्ही किंगमेकर राहणार'; नवाब मलिक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११मुंबई**

विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली असून महाविकास आघाडी आणि महायुतीच्या प्रचारसभा सुरू आहेत. दोन्ही बाजूंनी सरकार येण्याचा दावा केला जात आहे.माजी मंत्री आमदार नवाब मलिक उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडून निवडणूक लढत आहेत. मलिक यांनी सरकारबाबत मोठे विधान केले आहे. 'निकालानंतर काहीही होऊ शकते', असं विधान त्यांनी केले आहे. यामुळे आता राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहेत.

नवाब मलिक यांनी काही दिवसापूर्वी खासदार शरद पवार आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे एकमेकांच्या संपर्कात असल्याचा मोठा दावा केला होता. दरम्यान, माजी मंत्री आमदार नवाब मलिक यांनी टीव्ही नाईन या वृत्तवाहिनीला विशेष मुलाखत दिली. या मुलाखतीमध्ये त्यांनी निकालानंतर



काहीही होऊ शकते, असे स्पष्ट संकेत दिले आहेत.

भाजपाचे लोक माझ्याविरोधात लढत आहे, जनतेने मला उमेदवारी घ्या म्हणून सांगितले आहे. या मतदारसंघात एक वेगळाच निकाल समोर येणार आहे. जनतेचा आम्हाला भरगोस पाठिंबा मिळणार आहे. आम्ही महायुतीमध्ये असलो तरीही आम्ही विचारधारा कधीही सोडली नाही. टफ फाईट असताना किंग मेकर आम्ही ठरणार आहे, अजित पवार किंगमेकरच्या भूमिकेत राहणार आहेत, असा दावा माजी मंत्री नवाब मलिक यांनी केला.

नवाब मलिक म्हणाले, बारामतीमधून अजित पवार निवडून येतील. पवार कुटुंबाने एकत्र यावे अशी सर्वांची इच्छा आहे, असंही मलिक म्हणाले. भाजपाच्या 'बटोगे तो कटोगे' या स्लोगनवर बोलताना मलिक म्हणाले, ही वाह्यात स्लोगन आहे. या स्लोगनमुळे यांचा फायदा होणार नाही, उलट याचा तोटा होणार आहे. उत्तर प्रदेशमधील निकाल या राजकारणामुळे असे निकाल आले आहेत. आता 'एक है तो सेफ है', मला वाटतंय भाजपाचा दृष्टीकोण बदलत आहे.

## १० लाख अन् बाबा सिद्दिकी यांच्यावर ३ गोळ्या झाडल्या; आरोपी शिवकुमारचा धक्कादायक खुलासा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११मुंबई**

अजित पवार गटाचे नेते बाबा सिद्दिकी यांच्या हत्येप्रकरणी अटक करण्यात आलेल्या आरोपी शिवकुमारची मुंबई आणि उत्तर प्रदेश पोलीस चौकशी करत आहेत. लॉरेन्स बिश्नोई गँगच्या सूचनेवरून ही घटना घडली. ज्या व्यक्तीच्या गोळीमुळे बाबा सिद्दिकी यांचा मृत्यू झाला तो शिवकुमार असल्याचं तपासादरम्यान समोर आले. त्याने एकूण तीन गोळ्या झाडल्या, त्यापैकी दोन गोळ्या बाबा सिद्दिकी यांना लागल्या. या घटनेत त्यांचा जागीच मृत्यू झाला.

शिवकुमारने चौकशीदरम्यान सांगितलं की, लॉरेन्स बिश्नोई गँगच्या सांगण्यावरून त्याने १० लाख रुपयांसाठी बाबा सिद्दिकी यांची हत्या केली होती. बिष्णोई गँगने १० लाखांव्यतिरिक्त शिवकुमारला दर महिन्याला काही रक्कम देण्याचं आश्वासनही दिलं होतं. शिवकुमारला यूपी पोलिसांनी पकडले तेव्हा तो नेपाळला पळून जाण्याचा विचार




करत होता. शुभम लोणकर आणि यासीन अख्तर यांनी हत्येसाठी सर्व शूटर्सना शस्त्र, काडतुसे, सिम आणि मोबाईल दिल्याचं त्याने पोलिसांना सांगितलं.

अनमोल बिश्नोईच्या सूचनेवरून त्याने बाबा सिद्दिकी हत्या प्रकरण घडवून आणलं. शुभम लोणकरच्या मदतीने तो अनमोलच्या संपर्कात आला. शिवकुमार आणि आरोपी धर्मराज कश्यप हे एकाच गावचे असून ते पुण्यात भंगार विक्रेते म्हणून काम करत होते. त्यांची दोन्ही दुकानं पुण्यात शेजारी शेजारी होती. शुभम लोणकर याआधीही लॉरेन्स बिश्नोईसाठी काम करत होता.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिद्दीकी यांच्या हत्येनंतर शिवकुमार मुंबईहून पुण्याला परतला होता. प्रकरण वाढल्यावर तो पुन्हा पुण्याहून झाशीला गेला. तेथून ते लखनौमार्गे बहराइच या त्यांच्या गावी गेला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लवकरच आपल्यालाही पोलीस अटक करतील, अशी भीती शिवकुमारला होती. याच कारणामुळे त्याने बहराइच सोडण्याची योजना आखली होती. त्याचा प्लॅन नेपाळला पळून जाण्याचा होता.




## संपादकीय ......

# प्रदूषणाचा विळखा आणखी होतोय घट्ट

*हवा प्रदूषणामुळे जगभरात दरवर्षी सुमारे सत्तर लाख लोकांचा मृत्यू होत आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या आकडेवारीनुसार, जगभरातील ९९ टक्के लोकसंख्या घेत असलेली हवा ही उच्च पातळीचे प्रदूषक मिश्रित असते. जगातील जवळपास सर्वच मोठी शहरे या समस्येशी झुंजत आहेत. भारतही या समस्येपासून सुटू शकला नाही. देशाची राजधानी दिल्ली जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरांमध्ये गणली जाते. भारताचा शेजारी देश पाकिस्तानला सध्या प्रदूषणाचा सर्वाधिक त्रास होत आहे.*

*पाकिस्तानातील अनेक शहरांचा हवा गुणवत्ता निर्देशांक २००० वर पोहोचला आहे. शाळा, महाविद्यालये, कार्यालये सर्व बंद आहेत. दिल्लीपासून अवघ्या २६० किलोमीटर अंतरावर असलेल्या पाकिस्तानच्या लाहोर शहरातील हवा गुणवत्ता निर्देशांकाने १००० चा आकडा गाठला आहे. कोणत्याही देशाला प्रदूषण सीमेच्या आत ठेवता येत नाही. याचा परिणाम आसपासच्या देशांवर होणे स्वाभाविक आहे. दिल्लीतील प्रदूषण वाढण्यामागे हेही एक कारण असू शकते. सणांमध्ये ऑक्टोबर ते जानेवारी या हिवाळ्यात दिल्लीतील हवा गुणवत्ता निर्देशांक ४०० च्या जवळपास पोहोचतो. अनेक ठिकाणी तो ४०० च्या वरही जातो. यामागील कारणे पंजाब आणि हरियाणामध्ये काडी कचरा जाळणे आणि सणासुदीच्या वेळी फटाके फोडणे असे सांगितले जाते. लहानांसह मोठी शहरे प्रदूषणाच्या या समस्यांशी झुंजत आहेत. हिवाळ्याच्या काळात ही समस्या अधिकच तीव्र होते. या काळात प्रदूषणाची पातळी अनेक पटींनी वाढते. विशेषत: भारतासारख्या देशांमध्ये, जेथे थंडी आणि धूर एकत्रितपणे गंभीर आरोग्य समस्या निर्माण करतात. हिवाळ्यात वाढणार्या प्रदूषणाचा शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. हिवाळ्यात तापमानात घट झाल्यामुळे धूर आणि थंडी हवेत विरघळते आणि धुके व धुराच्या रूपात पसरते. या काळात कार्बन मोनोऑक्साईड, नायट्रोजन डायऑक्साईड, सल्फर डायऑक्साइड यांसारखे घातक रासायनिक घटक हवेत विरघळतात. तसेच कारखान्यांमधून निघणारा धूर आणि घरगुती लाकूड, कोळसा जाळल्याने होणारे प्रदूषणही हिवाळ्यात वाढते. या प्रदूषकांच्या संपर्कात आल्याने पीएम २.५ आणि पीएम १० सारखे सूक्ष्म कण हवेत विरघळतात आणि लोकांचे आरोग्य धोक्यात आणतात.*

*प्रदूषण ही केवळ एका देशाची, राज्याची किंवा शहराची समस्या नाही. प्रदूषणासाठी एक देश दुसर्या देशाला दोष देतो. तेथे होणार्या प्रदूषणासाठी पाकिस्तानने भारताला जबाबदार धरले आहे. लाहोरमधील प्रदूषणाचे कारण भारतातील पंजाब प्रांतात काडीकचरा जाळणे हे आहे, तर पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातच काडीकचरा जाळण्याच्या घटनांमध्ये कोणतीही घट झालेली नाही. एवढेच नाही, तर फटाके वापरण्यात पाकिस्तान जगातील अनेक देशांपेक्षा पुढे आहे. पाकिस्तानातील जवळपास सर्वच मोठ्या शहरांमध्ये नियमित फटाके बाजार दिसतात. तिथे दिवाळी साजरी होत नाही; पण प्रसंग कोणताही असो, पाकिस्तानात फटाक्यांची आतषबाजी पाहायला मिळते. एवढेच नाही, तर फटाके उत्पादनात पाकिस्तान जगातील अनेक देशांपेक्षा पुढे आहे. पाकिस्तान फटाके अनेक देशांमध्ये निर्यातही करतो. २०२२ पर्यंत पाकिस्तानने ४.५६ दशलक्ष डॉलर किमतीचे फटाके निर्यात केले होते. पाकिस्तान हा जगातील १६ वा सर्वात मोठा फटाका निर्यातदार देश आहे.*

*प्रदूषणाने त्रस्त असलेल्या जगातील अनेक देशांमध्ये फटाक्यांची मोठी बाजारपेठ आहे. यामध्ये चीन आघाडीवर आहे. २०२२ मध्ये चीनने १.२९ अब्ज डॉलरचे फटाके निर्यात केले. जर्मनी दुसर्या क्रमांकावर आहे. जर्मनीने ९१.७ दशलक्ष डॉलर किमतीचे फटाके निर्यात केले. त्याचप्रमाणे फ्रान्सने ८९.४ दशलक्ष डॉलर, अमेरिका ६४.२ दशलक्ष डॉलर, नेदरलँडस् ५८.५ दशलक्ष डॉलर्सचे फटाके निर्यात केले. निर्यात करणार्या देशांच्या यादीत भारत २२ व्या क्रमांकावर आहे. भारताने २.५४ दशलक्ष डॉलर किमतीचे फटाके निर्यात केले आहेत. जगभरातील फटाक्यांचे उत्पादन आणि निर्यात पाहता प्रदूषण रोखण्याचे गांभीर्य निरर्थक वाटते. हिवाळ्यात प्रदूषणासाठी काडीकचरा जाळणे जबाबदार मानले जाते. या हंगामात शेतकरी पीक जाळून टाकतात जेणेकरून ते शेत लवकर आणि स्वस्तात साफ करू शकतील. भारत आणि पाकिस्तानमध्ये ते बेकायदेशीर घोषित करण्यात आले आहे, तरीही असे जाळण्याचे प्रकार सुरूच आहेत. मात्र, बंदीमुळे या घटनांमध्ये नक्कीच घट झाली आहे. याशिवाय कारखाने आणि बांधकामांच्या औद्योगिक उत्सर्जनामुळे तसेच ट्रक आणि कारमधून निघणार्या धुरामुळेही हवेची गुणवत्ता खराब होते, जी थंडीची थंड हवा आल्यावर शहरांमध्ये अडकते. त्याचा थेट परिणाम मानवी आरोग्यावर होतो.विज्ञान आणि पर्यावरण केंद्राच्या मते, हिवाळ्यात दिल्लीच्या प्रदूषणात वाहनांचा धूर सर्वात मोठे कारण आहे. हे काडी कचरा जाळणे, रस्त्यावरील धूळ किंवा फटाके फोडण्यापेक्षा जास्त आहे. शहराच्या खंडित वाहतूक व्यवस्थेचा वाटा ५० टक्क्यांहून अधिक स्थानिक स्रोतांकडून होणारे प्रदूषण आहे. असा अंदाज आहे की, रोज १.१ दशलक्ष वाहने दिल्लीत प्रवेश करतात आणि बाहेर पडतात, ज्यामुळे हवेची गुणवत्ता आणखी बिघडते. वाहनांच्या या प्रवाहामुळे होणार्या वाहतुकीमुळे प्रदूषण, विशेषतः नायट्रोजन ऑक्साईडचे प्रमाण वाढते. दिल्लीच्या प्रदूषणात त्याचा वाटा ८१ टक्के आहे. दिल्ली हे फक्त एक उदाहरण आहे. देशातील सर्वच लहान-मोठ्या शहरांमधील प्रदूषणात वाहतूक व्यवस्था हा प्रमुख घटक आहे. जगातील मोठ्या शहरांचीही तीच अवस्था आहे.*

# जिरायत व बागायत हरभऱ्याच्या अधिक उत्पादनासाठी कधी करावी पेरणी

**दि.११ विदर्भ प्रजासत्ताक**

– हरभरा हे महाराष्ट्र राज्यातील प्रथम क्रमांकाचे रब्बी पीक आहे. कडधान्यवर्गीय पिकांचा मोठा फायदा म्हणजे त्यांच्यात असलेली नत्र स्थिरीकरण करण्याची क्षमता. मुळावरील ग्रंथीतील रायझोबीयम जीवाणुमार्फत हवेतील १३५ किलो नत्र/हेक्टर शोषुन त्याचे स्थिरीकरण केले जाते. त्यामुळे पुढील पिकास नत्र खताची उपलब्धता होते व जमिनीची सुपिकता वाढण्यास मदत होते.




महाराष्ट्रात हे पीक मुख्यतः कोरडवाहू क्षेत्रात घेण्यात येते. पारंपारिक पद्धतीमध्ये थोडासा बदल करून पीक उत्पादन तंत्रज्ञानाची जोड देवून सुधारित वाणांचा वापर केल्यास कोरडवाहू क्षेत्रासुद्धा चांगले उत्पादन मिळते.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**पेरणीची वेळ**

१) जिरायत हरभऱ्याची पेरणी जमिनीत पुरेसा ओलावा असताना म्हणजेच २० सप्टेंबर ते १० ऑक्टोंबर पर्यंत करावी.

२) हरभरा पेरणीनंतर सप्टेंबरच्या शेवटी किंवा ऑक्टोबरच्या सुरूवातीस पडणाऱ्या पावसाचा जिरायत हरभऱ्याची उगवण आणि वाढीसाठी चांगला उपयोग होतो.

३) जिरायत क्षेत्रात बियाणे खोलवर (१० सेमी) पेरणी करावी.

४) बागायत क्षेत्रात मात्र पाणी देण्याची सोय असल्यामुळे हरभऱ्याची पेरणी २० ऑक्टोबर ते १० नोव्हेंबरच्या दरम्यान करावी.

५) बागायत क्षेत्रात कमी खोलीवर (५ सेमी) हरभरा पेरणी केली तरी चालते.

६) पेरणीस जास्त उशीर झाल्यास किमान तापमान खूपच कमी होऊन उगवण उशीरा आणि कमी होते.

७) पिकाची वाढ कमी होऊन फांद्या, फुले, घाटे कमी लागतात.

८) १० नोव्हेंबर नंतर पेरणी १५ दिवसांनी व ३० दिवसांनी उशीरा केल्यास उत्पादनात अनुक्रमे २७ ते ४० % नुकसान होते.

**बीजप्रकिया आणि जीवाणूसंवर्धन**

१) बियाण्याची उगवण चांगली होण्यासाठी आणि रोपावस्थेत बुरशीजन्य रोगापासून संरक्षण करण्यासाठी पेरणीपूर्वी प्रतिकिलो बियाण्यास ५ ग्रॅम ट्रायकोडर्माची बिजप्रक्रीया करावी.

२) यांनतर १० किलो बियाण्यास रायझोबियम जीवाणू संवर्धनाचे २५० ग्रॅम वजनाचे एका पाकीटातील संवर्धन गुळाच्या थंड द्रावणातून चोळावे.

३) बियाणे एक तासभर सावलीत सुकवून लगेच पेरणी करावी.

४) यामुळे हरभऱ्याच्या मुळावरील ग्रंथीचे प्रमाण वाढून हवेतील नत्र अधिक प्रमाणात शोषून घेवून पिकास उपलब्ध केला जातो.

# सात अधिकारी, ३९ कर्मचाऱ्यांना मधुमेह, रक्तदाबासह विविध आजार

## निवडणुकीच्या कामकाजापासून दूर राहण्यासाठी नव्या क्लृप्त्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११धामणगांव रेल्वे**

विधानसभा निवडणुकीच्या कामासाठी प्रत्येक विभागातील कर्मचारी आणि अधिकारी रात्रंदिवस मेहनत घेत असताना, या कामातून वगळण्यात यावे, म्हणून जिल्ह्यातील आठ विधानसभा क्षेत्रातील सात अधिकारी ३९ कर्मचाऱ्यांनी आपल्याला मधुमेह, तसेच रक्तदाबाचा आजार असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर केले. या प्रकाराची चौकशी आगामी काळात होणार आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी जिल्हा प्रशासन व विधानसभा परिक्षेत्रातील अधिकारी, कर्मचारी डोळ्यात तेल घालून एक महिन्यापासून काम करीतआहे. प्रत्येक क्षेत्रात आचारसंहिता पथक, तसेच विविध भरारी पथकांची स्थापना करण्यात आली. यात महसूल प्रशासन, पोलीस ठाणे, अप्पर वर्धा, पाटबंधारे विभाग व अन्य विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आपली या कामातून सुटका व्हावी, म्हणून अनेकांनी क्लुप्ती लढविली आहे. आपल्याला मधुमेह, रक्तदाब, असा आजार असल्याचे प्रमाणपत्र सादर केले आहे. या प्रमाणपत्राची चौकशी करण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाने संबंधित विभागाला दिले आहेत. हे प्रमाणपत्र बनावट आढळल्यास या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर निलंबनाचीकारवाई होणार आहे.

कलर बॉक्सपरजिल्ह्यातील वाहनांवर लक्षनिवडणुकीच्या प्रचाराला गती आली आहे. मतदारसंघात कोणत्या उमेदवारांचे परवानगी घेतलेले चारचाकी वाहन कोणत्या परिसरात फिरत आहे, परवानगी न घेता मतदारसंघात काही वाहने फिरत असल्यास थेट वाहनचालकावर कारवाई करून पोलिस ठाण्यात ही गाडी लावण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहे. दुसऱ्या जिल्ह्यातील वाहनावर निगराणी ठेवण्याचे आदेश प्रशासनाने पोलिस विभागाला दिले आहेत.

# आरोळ्या आणि गर्जना

*महाराष्ट्राच्या अवकाशात सध्या आठ- दहा प्रमुख पक्षांचे नेते हेलिकॉप्टरने घिरट्या घालत आहेत. निवडणूक आल्याबरोबर उमेदवारांची नावे जाहीर होण्याआधी स्टार प्रचारकांची नावे जाहीर होतात. ‘स्टार’ हा शब्द सिनेसृष्टीसाठी महत्त्वाचा असतो; पण राजकारणातही तितकाच महत्त्वाचा असतो. एखादा मोठा कलावंत किंवा नट असेल किंवा एखादी सुंदर दिसणारी नटी असेल, तर तिला स्टार म्हणता येईल. अशा तारकांना पाहण्यासाठी पण लोकांची गर्दी होत असते. राजकीय स्टार प्रचारकांना ऐकण्यासाठी लोक गर्दी कशासाठी करतील, असा प्रश्न आम्हाला पडतो. स्टार प्रचारकांपैकी मैदान गाजविणार्या म्हणजेच सभा गाजवणार्या नेत्यांना पक्षाने हेलिकॉप्टर दिलेले असते. राज्यामध्ये रस्त्यांचे खस्ताहाल असल्यामुळे कितीही भारीची चारचाकी गाडी दिली, तरी फार तर दोन सभा नेता घेऊ शकेल. असा काही अडथळा हेलिकॉप्टरला नसतो. हेलिकॉप्टर थेट हवेतून उडत उडत दुसर्या ठिकाणी कमी वेळात पोहोचते आणि उतरल्याबरोबर अवघ्या काही मिनिटांत सभा सुरू होते आणि त्यानंतर पुढची सभा असा त्यांचा क्रम असतो.*




*काही अपवाद वगळता कुणाही नेत्याला ऐकण्यामध्ये किंवा प्रत्यक्ष पाहण्यामध्ये जनतेला अजिबात इंटरेस्ट उरलेला नाही, याची जाणीव राजकीय पक्षांना पण असते. लोकांना आणावे लागते. जेवणा-खाण्याचा खर्च करावा लागतो आणि दरडोई काही ना काही तरी पैसे देऊन परत नेऊन सोडावे लागते. कुणाच्या सभेला फार मोठी गर्दी झाली म्हणजे तेथील उमेदवार निवडून येणार, असे काही राहिलेले नाही.*

*सभेला गर्दी जमवण्याचे काम हे त्या पक्षाच्या उमेदवाराचे असते. तो उमेदवार आणि त्याचे कार्यकर्ते बिचारे खूप कष्ट करून गर्दी जमवतात. गर्दी जमते, अमुकतमुक की जय म्हणते, उमेदवाराचे नाव घेऊन ‘तुम आगे बढो हम तुम्हारे साथ हैं’ असे म्हणते आणि संध्याकाळी तृप्त मनाने आपापल्या घरी पोहोचते. दुसर्या दिवशी दुसर्या पक्षाची सभा असते. त्या पक्षाने तिकीट दिलेला उमेदवार पुन्हा त्याच जनतेकडे येतो. सभेला चला म्हणून त्यांना विनंती करतो. पहिल्यापेक्षा जास्त मानधन घेऊन तेच लोक दुसर्या पक्षाच्या सभेला येतात. तिथेही ते येऊन ‘अमुकतमुक यांचा विजय असो’ अशा घोषणा देतात. ‘अमुकतमुक तुम मागे बढो, हम तुम्हारे साथ हैं’ अशा घोषणा देतात आणि तृप्त मनाने घरी जातात.*

*कधीकाळी हेलिकॉप्टर ही दुर्मीळ गोष्ट होती तेव्हा आकाशात घिरट्या घालणारे हेलिकॉप्टर पाहण्यासाठीच गर्दी होत असे. आता हेलिकॉप्टर हे राजकारणी लोकांचे नेहमीचे वाहन होऊन बसलेले आहे. त्यामुळे लोकांनाही त्याचे अजिबात अप्रूप राहिलेले नाही. गर्दी दिसली की, नेत्याला आवेश येतो आणि तो आरोळ्या ठोकायला आणि गर्जना करायला लागतो. आपल्या विरोधी पक्षाला नामोहरम करण्यासाठी तो इतिहासाची मदत घेतो, कधी नजीकच्या भूतकाळात घडलेल्या गोष्टींचे दाखले देतो, त्यांचे कसे चुकले आणि विकास आम्हीच कसा करणार, हे जनतेला समजावून सांगतो. सध्या जनता आभाळात घिरट्या घालणार्या हेलिकॉप्टरची घरघर आणि नेत्यांनी दिलेल्या आरोळ्या आणि गर्जना यांचा आनंद घेत आहे. लोकशाहीमध्ये मतदार हा राजा असतो; पण या राजाचे राज्य अवघ्या पंधरा दिवसांचे असते, असे तुमच्या लक्षात येईल.*




# या कारणासाठी फायदेशीर ठरतो बहुगुणी 'अननस'

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक**

लडस्, जॅम यासारख्या पदार्थांत अनेकदा आणि हमखास असतो तो अननस. हे फळ बाहेरून टोचरं, रानटी दिसत असलं तरी वरचं साल काढल्यावर अनुभवाला येणारा या फळाच्या फोडींचा खास पोत आणि त्यात ओतप्रोत सामावलेला मधुर ओलावा काही औरच! खास चव आणि गुणधर्म यामुळे हे फळ माणसांच्या आहारातलं आपलं वैशिष्ट्यपूर्ण स्थान आणि मान टिकवून आहे.

आपल्या शरीरात डिहायड्रेशन होऊ नये, पाण्याची कमतरता निर्माण होऊ नये यासाठी अननस खाणं हा उत्तम पर्याय ठरू शकतो. हे फळ चविष्ट तर आहेच; शिवाय त्यात भरपूर पोषक घटकही सामावलेले आहेत. ते घटक शारीरिक-मानसिक आरोग्यासाठी अनेक प्रकारे उपकारक ठरू शकतात.

अननस खाल्ल्याने शरीराची प्रतिकारशक्ती वाढते. अननसामध्ये असलेलं क जीवनसत्त्व मानवी शरीरासाठी अत्यंत आवश्यक असतं. व्हिटॅमिन सी रोगप्रतिकारशक्ती वाढवून मौसमी आजारांचा धोका कमी करतं. शरीर दीर्घकाळ निरोगी राहण्यासाठी अननसाच्या बहुगुणांचा फायदा होतो. अननस केवळ रोगप्रतिकारशक्ती वाढवत नाही तर पचनालाही तो साहाय्यभूत ठरतो.

अननसात असलेलं कॅल्शियम स्नायूंच्या दुखण्यापासून आराम देतं. यामध्ये असलेलं मँगेनिज आणि कॅल्शियम हाडांसंदर्भातल्या त्रासांवर गुणकारी ठरतं. अननसाचं सेवन लहान-मोठी हाडं व स्नायू मजबूत करण्याच्या कामी येतं.



अननसात तंतुमय घटकांचं अर्थात फायरचं प्रमाण खूप असतं. हे फायबर कोलेस्ट्रॉलचं प्रमाण नियंत्रित करण्यात आणि हृदय निरोगी ठेवण्यास मदत करतं. हृदयाशी संधित आजारांचा धोका कमी करण्यासाठी आणि लठ्ठपणा दूर करण्यासाठी अननसाचं सेवन उपयुक्त मानलं जातं.

अननस खाल्ल्याने वजन कमी होण्यासोबतच पोटाची चरबी कमी होण्यास हातभार लागतो. अननसाचं सेवन शरीराला हायड्रेट ठेवण्यासोबतच मुख्यत: शरीरातलं मेटॅबॉलिजम सुधारतं व चयापचय प्रक्रिया सुरळीत ठेवतं.

या सार्यातून वाढीव चरबी व वजन कमी होण्याची प्रक्रिया वेग घेण्याची शक्यता वाढते. आपल्या ‘डाएट’विषयी संवेदनशील असणार्यांना अननस खाण्याचा सल्ला दिला जातो, तो त्यासाठीच!

# दिवाळीत तोंड गोड केलं असेल ना? तर आता शरीर स्वच्छ करून घ्या, नाहीतर आजारपण येईल

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक**

दिवाळीत मिठाई, चकली, मूठभर चिवडा आणि तोंडभर लाडू यावर यथेच्छ ताव मारला जातो. उष्मांकाने भरलेल्या अन्नपदार्थांमुळे शरीर आणि मन आळसावलेले असते. वर्षातून एकदा हा आनंद लुटणे योग्य असले, तरी आता शरीराला आवश्यक विश्रांती देण्याची वेळ आली आहे. शरीरात जमा झालेली अतिरिक्त साखर आणि चरबीपासून शरीर ’डिटॉक्स’ करून घ्या, असा सल्ला आहारतज्ज्ञांनी दिला आहे.

’डिटॉक्स’ म्हणजे शरीरातील विषारी पदार्थ आणि अशुद्धता काढून टाकण्याची प्रक्रिया. शरीराला पुन्हा आरोग्याकडे परत नेण्यासाठी आणि ताजेपणा टिकवून ठेवण्यासाठी याची मदत होते. हे केवळ विशिष्ट अन्न खाणे अथवा शरीराची उपासमार करण्यापुरते मर्यादित नसल्याचे आहारतज्ज्ञ डॉ. स्वाती अवस्थी यांनी सांगितले. त्यांच्यानुसार, शरीर डिटॉक्स करण्यासाठी पाणी आणि जलपदार्थांची भूमिका महत्त्वाची ठरते.

त्यामुळे दररोज किमान ८ ग्लास पाणी प्या. दिवसाची सुरुवात शक्य असेल तर कोमट पाणी आणि लिंबूने करा. सोबतच नारळपाणी आणि ताकदेखील पिऊ शकता. ताजी फळे, भाज्या आणि औषधी वनस्पतींपासून बनवलेल्या निरोगी स्मुदीज हासुद्धा चांगला पर्याय ठरतो. चहा, कॉफीऐवजी ग्रीन टी घ्या. हे शरीरातील पाण्याची चरबी काढण्यास मदत करते.




**पुरेशी झोप घ्या**

रात्री चांगली झोप ही शरीर आणि मानसिक स्वास्थ्यासाठी आवश्यक आहे. ताजे, उत्साही आणि तणावमुक्त राहण्यासाठी किमान ७ ते ८ तास झोपण्याची सवय लावा.

**कॅलरीज बर्न करा**

योग्य आहारासोबतच चालणे, ट्रेडमिलवरचा व्यायाम, योगासनांची निवड करा. काही मिनिटांसाठी योग आणि ध्यानाचा सराव करा. त्यामुळे निरोगी मन आणि शरीराचे योग्य प्रकारे संचालन करण्यास मदत मिळते.

**तळलेले पदार्थ टाळा**

तळलेल्या पदार्थांना आता विश्रांती द्या. आहारात कच्ची फळे आणि भाज्यांचा समावेश करा. हिरव्या भाज्या, पालक, बीटरूट, काकडीतील पुरेसे अँटिऑक्सिडंट्स शरीराची चयापचय प्रक्रिया मजबूत करण्यास मदत करतात. आहारात लिंबू, टोमॅटो, संत्री, आवळासारख्या व्हिटॅमिन सीने समृद्ध पदार्थांचा समावेश करा. बाजारातील प्रक्रिया केलेले आणि पॅकेज केलेले खाद्यपदार्थ टाळा.


RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026




# लहान भावाला विधी मंडळात पाठवा राज्यात पुढील पाच वर्षात धामणगाव मतदार संघ विकासाचे मॉडेल ठरेल - उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११धामणगाव रेल्वे,** पंधरा वर्षाच्या तुलनेत अडीच वर्षात आ.प्रतापदादा अडसड यांनी २ हजार ३०० कोटीची विकास कामे केली माझा लहान भाऊ प्रताप ला आपण विधिमंडळात पाठवाराज्यात विकासाचा मॉडेल हे धामणगाव विधानसभा मतदारसंघ ठरेल असा विश्वास राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला

येथील मिशी कोटकर मैदानात भाजपा महायुतीचे उमेदवार प्रताप अडसड यांच्या प्रचार सभेसाठी धामणगावात आले होते ते बोलताना म्हणाले की यापूर्वी पंधरा वर्षात या मतदारसंघात केवळ जातीपाती चे राजकारण माजी आमदाराने केले पंधरा वर्ष एमआरजीएस चे अध्यक्ष असताना पादन रस्ते सुद्धा झाले नाही ९४किमी चे रस्ते आ प्रताप अडसड यांनी आणले तर माजी आमदाराने याविषयी तक्रारी केल्या स्वतःच्या ताब्यात असलेल्या बाजार समिती व खरेदी विक्री संघात सोयाबीनची खरेदी सुरू न करता शेतकऱ्यांना वेठीस धरले आता माजी आमदाराला शेतकऱ्याचा पुळका आला. समृद्धी मार्गासाठी प्रथम विरोध केला त्यानंतर स्वतःच्या शेत जमिन प्रकल्पाला देऊन कोट्यावधी रुपये मिळून घेतले विकासासाठी पंधरा वर्ष व आताची अडीच वर्षे याची तुलना आपणच करावी माझ्या लहान भावाला प्रताप अडसड यांना विधिमंडळात पाठवा हा मतदारसंघ राज्यात पहिल्या क्रमांकाचे विकासाचे मॉडेल ओळखला जाईल असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला

मागच्या काळात कापूस, सोयाबीनचे भाव कोसळल्याने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी भावांतर योजना आणली. हेक्टरी पाच हजार रुपयांची मदत शेतकऱ्यांना दिली, आम्ही एवढ्यावरच थांबलेलो नाही.येत्या काळात हमीभावापेक्षा कमी दर शेतकऱ्यांना मिळाल्यास यातील फरकाची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करणार, असे वचन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे.


उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकरी हितासाठी कटिबद्ध असल्याचे वचन दिले आहे. शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी संपूर्ण कर्जमाफीचा करणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी व्यासपीठावर आमदार प्रताप अडसड, माजी खासदार नवनीत राणा,सुरेश वाघमारे जनार्धन रोठे,संतोष महात्मे, हरीशचंद्र खंडाळकर,बबनराव गावंडेनिकेत ठाकरे,रवींद्र मुंदे, घनशाम सारडाबंडू भुते,मनोज डहाके,मोहन गावंडे,उषा तिनखेडे,नलिनी मेश्राम,रामदास निस्ताने,प्रशांत मून,पुरुषोत्तम बनसोड दुर्गाबक्षसिंग ठाकूर,विलास बुटले,अर्चना तिखले,सुरेखाताई शिंदे,,राकेश पाठक, रणजीत पाटेकर,मनोज चव्हाण, रुपाली नाकाडे, मोनाली बाबुळकर, सविता ठाकरे, कय्युम भाई, जावेद भाई, योगश अंभोरे, गिरीश भूतडा, पवन पडोळे, निवृत्ती लोखंडे, प्रफुल मानके,योगेश झिमटे,रोशन खेरडे,अंकित कदम,अखीलेश पोळ,किरण निस्ताने, नंदा माने, श्रीराम पत्रे व आदी उपस्थित होते.देवेंद्र फडणवीस म्हणाले, शेतकऱ्यांसाठी मोफत विजेचा निर्णय घेतला. सरकारकडून शेतकऱ्यांना कृषीपंपासाठी ही वीज पुरविली जाईल. रात्री शेतावर पाणी देण्यासाठी जाण्याचीही गरज पडणार नाही. दिवसा शेतात काम करीत असतानाच सिंचन करणे शक्य होईल. कारण दिवसा १२ तास वीज शेतकऱ्यांना मिळणार आहे. हे प्रत्यक्षात आणण्यासाठी वेगळी कंपनीच उभारली आहे.

लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांना ओवाळणी म्हणून दर महिन्याला १५०० रुपये देतो. आम्ही पैसे देऊ असे सांगताच महाविकास आघाडीच्या नेत्यांनी वेड्यात काढले, अनेक वल्गना केल्या. हायकोर्टात गेले. कोर्टाने योजना बंद करण्यास नकार दिला. यानंतर आम्ही त्यांच्या नाकावर टिच्चून नोव्हेंबर महिन्यापर्यंतचे पैसे खात्यावर दिले आहेत. तुमचा आशीर्वाद मिळाला की २१०० रुपये आम्ही लाडक्या बहिणींना देणार आहोत. महाविकास आघाडी वाल्यांचे हे षडयंत्र थांबविण्यासाठी त्यांच्या डोक्याचे नटच कसतो. मग लाडक्या बहिणींविषयी असले विरोधी विचार त्यांच्या डोक्यात येणार नाही, असा घणाघात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. संचालन. रामदास निस्ताने यांनी केले तर आभार मनोज डहाके .यांनी मानले.

# कोतवाली ठाण्यासमोरील खिलौना सेंटरला भीषण आग

## कुठलीही जीवितहानी नाही : विद्युत ताराही जळाल्या

### साडे तीन तासानंतर आग आली आटोक्यात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ अमरावती** स्थानिक जयस्तंभ ते श्याम चौकादरम्यानच्या व कोतवाली पोलिस ठाण्यासमोर असलेल्या एका खिलौना सेंटरला सायंकाळी भीषण आग लागली. या आगीत तेथील खेळणी व अन्य साहित्य जळून खाक झाले. त्यात लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तविण्यात आला. सुमारे तासभरानंतर महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी सुमारे १९ बंबाच्या सहाय्याने आगीवर नियंत्रण मिळविले. या भीषण आगीची झळ महावितरणच्या विद्युत तारांना देखील पोहोचली. स्पार्किंगमुळे आगीत भर पडली.क्रिष्णानगर येथील रहिवासी विजय बजाज यांचे जयस्तंभ चौक- श्याम चौक मार्गावर बजाज खिलौना सेंटर आहे. रविवारी सायंकाळी सहाच्या सुमारास दुकानातील वरच्या माळ्यावर अचानक आग लागली. ही बाब लक्षात येताच बजाज यांच्यासह कर्मचारी दुकानाबाहेर पडले. त्यांनी तातडीने अग्निशमन दलाला माहिती दिली. त्याचवेळी आगीने रौद्र रूप धारण केले. दुकानाच्या वरच्या माळ्यावरून आग खालच्या माळ्यावर पसरली. त्यामुळे दुकानातून आगीचे प्रचंड लोळ निघू लागले. अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळ गाठून आग विझविण्यासाठी प्रयत्न सुरू केले. अथक परिश्रमाअंती एक तासानंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण मिळविले. तोपर्यंत या आगीत दुकानातील खेळणेव अन्य साहित्य पूर्णतः जळून खाक झाले. या आगीची शेजारी असलेल्या अन्य एका खिलौना सेंटरलाही काहीप्रमाणात झळ बसली. सिटी कोतवालीचे ठाणेदार मनोहर कोटनाके हेदेखील घटनास्थळी पोहोचले होते. तब्बल तीन तासानंतर ही आग आटोक्यात आली तो पर्यंत लाखो रुपयांचा माल जळून राख झाला होता.

# मतदानाच्या वेळेस बोटाला लागणारी शाई मैसूरवरून शहरात

## २५ लाख बोटांना लागणार शाई



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती :-**
जिल्ह्यातील आठ मतदारसंघात २५ लाख मतदार आहेत. मतदान केल्याची ओळख म्हणून त्यांच्या डाव्या हाताचे तर्जनीला काळ्या रंगाची शाई लावण्यात येईल. देशभरात फक्त म्हैसूर येथील 'म्हैसूर पेंट अॅन्ड वार्निश' या कंपनीद्वारा शाईचे उत्पादन केल्या जाते. तेथून जिल्ह्यात ६७२० बॉटल आणण्यात आल्या आहेत. प्रत्येक मतदान केंद्रांवर प्रत्येकी दोन बॉटल देण्यात येणार आहे.

जिल्ह्यात आठ विधानसभा मतदारसंघात २५.३५ लाख मतदारआहे. यामध्ये जे मतदार मतदानासाठी केंद्रावर येतात, त्यांच्या डाव्या हाताचे तर्जनीला मतदान केल्याची ओळख म्हणून काळी-जांभळी शाई लावण्यात - येते. ही शाई किमान आठ ते दहा दिवसमिटत नाही. ज्यांना बोटे नाहीत किंवा काही अडचण आहे. त्यांच्यासाठी अन्य पर्याय आयोगाने उपलब्ध केले आहेत. ही शाई फक्त देशभरात एकाच कंपनीमध्ये तयार करण्यात येते. अन्यकंपनीला याची परवानगी नाही. मतदानाचा गैरप्रकार टाळण्यासाठी व पुनर्मतदान होऊ नये, यासाठी या शाईचा वापर होत असल्याची माहिती जिल्हा निवडणूक विभागाने दिली.

**१० मिलीच्या बॉटलची शाई पुरते ७०० मतदारांना**

ही शाई जांभळ्या रंगाची असते व बोटाला लावल्यावर शाईचा काळा डाग पडतो. या शाईमध्ये सिल्वर नायट्रेट हा १० ते १८ टक्के घटक असतो. एका मतदाराकडून दुसऱ्या मतदाराच्या बोटाला विषाणू लागू नये म्हणून शाईमध्ये बायोसाइड हे रसायन वापरल्या जाते. १० मिलीच्या एका बॉटलमध्ये किमान ७०० मतदारांच्या बोटाला शाई लावता येते. बोटाला लावल्यावर शाई ४० सेंकदात सुकते.

जिल्ह्यातील आठ मतदारसंघात २७०८ मतदान केंद्र आहेत. या प्रत्येक केंद्रावर दोन व ४० टक्के अधिक शाई बॉटल मतदान साहित्यासोबत देण्यात येणार आहे.

**- प्रवीण राऊत,** जिल्हा नोडल अधिकारी,
मतदान साहित्य वाटप

# १३०९४ हजार उमेदवारांनी दिली 'टीईटी'ची परीक्षा

## ३२ परीक्षा केंद्रे : ८३१ जणांची दांडी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती :**महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषदेमार्फत १० नोव्हेंबर रोजी शहरातील ३२ परीक्षा केंद्रांवर शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) परिक्षा झाली. यात १३ हजार ९२५ पैकी १३ हजार ९४ उमेदवारांनी टीईटी दिली. दोन सत्रांत घेण्यात आलेल्या या परीक्षेला ८३१ उमेदवारांनी दांडी मारली. टीईटी परीक्षेत इयत्ता पहिली ते पाचवीच्या शिक्षक पदासाठी ३२ केंद्रांवर पेपर एकची सकाळच्या सत्रात परीक्षा घेण्यात आली. तर सहावी ते आठवीच्या शिक्षक पदासाठी दुपारच्या सत्रात ३२ परीक्षा केंद्रांवर पेपर दोन घेण्यात आला. यामध्ये पेपर एकला ५ हजार ६०० उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ५ हजार २४२ जण हजर होते. तर ३५८ उमेदवार गैरहजर होते. तर पेपर २ साठी ८ हजार ३२५ उमेदवारांनी नोंदणी केली होती. यापैकी ७ हजार ८२५ विद्यार्थी परीक्षेला हजर होते. तर ४७३ विद्यार्थ्यांनी परीक्षेला दांडी मारली. टीईटी परीक्षेसाठी जिल्हाधिकारी सौरभ कटीयार व जिल्हा परिषदेच्या सीईओ संजिता महापात्र यांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक शिक्षण अधिकारी बुद्धभूषण सोनोने, माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रिया देशमुख यांच्या नेतृत्वात टीईटी परीक्षा सुरळीत पार पडण्यासाठी नियोजन करण्यात आले होते.कुठलाही गैरप्रकार होणार नाही, यासाठी प्रत्येक केंद्रात परीक्षागृहामध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्याची नजर होती.

यंदा 'टीईटी'त 'एआयए'चा झाला वापर१० नोव्हेंबर रोजी झालेल्या टीईटी परीक्षेत विशेष खबरदारी घेण्यात आली. परीक्षा परिषदेने यंदा परीक्षेसाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. याशिवाय मेटल डिटेक्टरने प्रत्येक विद्यार्थ्यांची कसून तपासणी करण्यात आली. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला परीक्षा केंद्रात परीक्षेपूर्वी अर्धा-पाऊण तास अगोदर हजर राहणे बंधनकारक केले होते.

# कौंडण्यपूरच्या कार्तिक मास यात्रेमध्ये यावर्षीही रंगारंग कार्यक्रमांची मेजवानी

## २९ नोव्हेंबर रोजी नयनरम्य भव्य ''बोटिंग शो'' चे विशेष आकर्षण

### महोत्सव विदर्भाचा- विदर्भाच्या पुरातन राजधानीचा नामक ''अंबा-रुख्मिणी महोत्सवची पहिली बैठक संपन्न



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११कौंडण्यपूर-** विदर्भाची पुरातन राजधानी, माता रुक्मिणीचे माहेरघर, कुलस्वामिनी अंबिका मातेचे शक्तीपीठ असलेल्या श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथील कार्तिक मास यात्रा प्रारंभ होत असून दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा या यात्रेमध्ये विदर्भातील अनेक सुप्रसिद्ध कलाकार तसेच सिने अभिनेते व संगीत, क्रीडा, साहित्य, तसेच सामाजिक, शैक्षणिक, अशा सर्वच क्षेत्रातील रंगारंग कार्यक्रमांची मेजवानी घेऊन येणाऱ्या ''महोत्सव विदर्भाचा, विदर्भाच्या पुरातन राजधानीचा'' नामक ''अंबा-रुख्मिणी महोत्सव-२०२४'' ची पहिली बैठक सोमवार दिनांक ०७ नोव्हेंबर २०२४ रोजी श्री अंबिका देवी मंदिर मंगल कार्यालय येथे संपन्न झाली. या बैठकीमध्ये सर्वप्रथम यावर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमाबद्दल चर्चा करण्यात आली. आगामी २९, ३० नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर दरम्यान या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून उत्सव समितीच्या सभासदांकडून यावर्षी काही नवीन उपक्रम आयोजित करण्याचे सुद्धा ठरविले आहे. ज्यामध्ये २९ नोव्हेंबर रोजी वर्धा नदीपात्रात नयनरम्य अशा भव्य ''बोटिंग शो'' चे आयोजन करण्यात येणार आहे. ज्यामध्ये आकर्षक फुलांची सजावट व दिव्यांची आरास याचे सुद्धा मुख्य आकर्षण असणार आहे.

त्याचबरोबर राज्यस्तरीय भव्य एकता मॅरेथॉन स्पर्धा सुद्धा आयोजित करण्यात येणार असून विजेता स्पर्धकांना आकर्षक बक्षिसे सुद्धा वितरित करण्यात येणार आहे. तसेच स्थानिक कलावंतांना हक्काचे व्यासपीठ मिळावे म्हणून सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन, त्याचबरोबर भव्य महाआरोग्य व रोगनिदान शिबीराचे सुद्धा आयोजन करण्यात आले असून त्यामध्ये ७५ तज्ञ डॉक्टरांची उपस्थिती राहणार असून या शिबिरात ज्या रुग्णांची तपासणी केली जाईल त्यापैकी ज्यांना शस्त्रक्रिया करायची आहे, त्यांची मोफत शस्त्रक्रिया नागपूर येथील उच्च दर्जाचे रुग्णालय म्हणून ओळखले जाणारे स्व. शालिनीताई मेघे हॉस्पिटल येथे मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे त्यांच्या जाण्याची, राहण्याची आणि खाण्याची सुद्धा मोफत व्यवस्था करण्यात येणार आहे. यावर्षीच्या कार्यक्रमाची कार्यक्रम पत्रिका लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती अक्षय पुंडेकर यांनी आपल्या प्रास्ताविकातून दिली. कार्यक्रमाची रूपरेषा श्री गजाननराव बांबल यांनी आपल्या संचालनातून सर्वांना सांगितली. या बैठकीला दिपकराव जुमडे, अंकुशराव देऊळकर, बाळूभाऊ ठाकरे, अमोल पुंडेकर, मैताब शाह, निखिल ठाकरे, अंकुश पुंडेकर, रोहित धवणे, प्रयास भाकरे, प्रतीक कदम, वैभव हेटे, सार्थक कदम, वेदांत वानखडे, कृष्णा ठाकरे, दक्ष खंडारे यांच्या उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कापसाला भाव कवडीमोल शेतकऱ्यांच्या डोळ्यांत पाणी

## ..हमीभावापेक्षा दर कमी, गरज असताना साठवणूक कुठवर ?



**गावातील हमीभावापेक्षा**

व्यापारी कमी भावात कापूस मागत आहेत. कापूस वेचण्याकरिता मजुरी १०-१२ रुपये प्रतिकिलो या लागली. त्यामुळे एक क्विटल हजार ते बाराशे रुपये खर्च अत्ताच येतो. तो देण्याकरिता कापूस गावातील व्यापारालाच विकावा लागत आहे.मागच्या वर्ष ही अशीच परिस्थिति होती आणि या वर्ष ही अशीच परिस्थिति आहे

- प्रदिप बंड शेतकरी-

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अचलपूर** - कापसाचे उत्पादन यंदा समाधानकारक असले तरी हमीभावापेक्षा कमी दर मिळत असल्यामुळे शेतकरी रडकुंडीला आला आहे. शेतकऱ्यांनी कापसाची साठवणूक केली आहे. भाव वाढतील या आशेवर शेतकरी आहेत; परंतु काही गरीब शेतकऱ्यांना पैशांची गरज असल्यामुळे नाइलाजास्तव कापूस विकावा लागत आहे. भाऊबीजेला बहीण आलेली असताना या पांढऱ्या सोन्याची साठवणूक कुठवर शक्य आहे, असा त्यांचा सवाल आहे.

दिवाळीच्या निमित्ताने कापसाची खासगी बाजारपेठेत आवक वाढली आहे. कापूस खरेदीसाठी व्यापाऱ्यांचीही ग्रामीण भागात लगबग दिसून येत आहे. व्यापारी शेतकऱ्यांना मनमानी भावात कापूस मागतो व शेतकऱ्याला देण्यास भाग पाडतो, असा आता शिरस्ता झाला आहे. केंद्राकडून जाहीर झालेला कापसाचा हमीभावसात हजारांच्या वर आहे. मात्र, खासगी बाजारपेठेत कापसाचे दर नीचांकीवर आहेत. खासगी व्यापारी कापसाला ६५०० ते ६९०० रुपये प्रतिक्विंटल भाव देत आहेत. केंद्र सरकारने २०२४-२५ साठी कापसाच्या हमीभावात ५०१ रुपयांची वाढ केली. चालू हंगामात मध्यम धाग्याच्या कापसासाठी ७१२१ रुपये आणि लांब धाग्याच्या कापसासाठी ७५२१ रुपये हमीभाव जाहीर केला; परंतु व्यापारी त्यापेक्षा कमी दर देत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. हमीभावापेक्षा कमी दराने कापूस विकावा लागत आहे. दुसरीकडे आंतरराष्ट्रीय वायदे बाजारात कापसाचे दर वाढले आहेत. वायदे बाजारात मागील आठवड्यात ७२.३४ सेंट प्रति पाउंडवर कापसाचे दर होते. ते आता ७२.६९ सेंट प्रति पाउंडवर गेले. त्यामुळे देशातील बाजारपेठेतही कापसाचे दर वाढणार आहेत. कापसाचे पीक समाधानकारक होईल व कापसाला चांगला भाव मिळेल, अशी होती.

# वारंवार मिळणाऱ्या स्फोटाच्या धमक्यांमुळे रेल्वेला धडकी


## नागपूरसह विविध रेल्वे स्थानकांवर हायअलर्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नागपूर:** ठिकठिकाणची रेल्वे स्थानकं आणि रेल्वे गाड्यांमध्ये प्रवाशांची गर्दी ओसंडून वाहत असतानाच वारंवार स्फोट घडविण्याची धमकी मिळत असल्याने रेल्वे प्रशासन पुरते बेजार झाले आहे. दरम्यान, शनिवारी रात्री पुन्हा असाच हायअलर्ट मिळाल्यामुळे नागपूरसह विविध राज्यातील मोठ्या रेल्वे स्थानकांवर सुरक्षा व्यवस्था वाढविण्यात आली आहे.

जैश-ए-मोहम्मदने या पाकिस्तानी दहशतवादी संघटनेने ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात विविध प्रांतातील रेल्वे गाड्यांमध्ये स्फोट घडविण्याची धमकी दिली होती. त्यानंतर रेल्वे गाड्या, ठिकठिकाणच्या रेल्वे स्थानकावर, परिसरात सशस्त्र जवानांचा बंदोबस्त वाढविण्यात आला. बॉम्ब शोधक आणि नाशक पथक (बीडीडीएस), डॉग स्कॉडकडून वारंवार गाड्यांची तपासणी केली जाऊ लागली. हे सर्व सुरू असताना रेल्वे गाड्यांमध्ये, स्थानकांवर स्फोट घडवून आणण्याचे धमकीसत्रच सुरू झाले. १४ ऑक्टोबरला राजस्थानच्या हनुमानगडमध्ये आणि २८ ऑक्टोबरला नागपूर स्थानकावर स्फोट करण्याची धमकी मिळाली. १ नोव्हेंबरला दरभंगा येथून दिल्लीकडे निघालेल्या बिहार संपर्क क्रांती एक्सप्रेसमध्ये बॉम्ब असल्याची सूचना मिळाली. ८ नोव्हेंबरला अलीगड रेल्वे स्थानक बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाली. या सर्व धमक्यांमुळे रेल्वे प्रशासनात प्रचंड खळबळ निर्माण झालेली असताना आता ९ नोव्हेंबरला पुन्हा अलर्ट मिळाल्याने रेल्वे प्रशासनासोबतच सुरक्षेची जबाबदारी सांभाळणाऱ्या रेल्वे सुरक्षा दल (आरपीएफ) आणि रेल्वे पोलिसांचीही (जीआरपी) तारांबळ उडाली आहे.

### जेथून धमकी, तेथेच भीषण स्फोट

जैश ए मोहम्मद ही दहशतवादी संघटना पाकिस्तानातून भारतात घातपात घडविण्याचे कट-कारस्थान रचत आहे. जैशने भारतात विविध रेल्वे स्थानकांवर स्फोट घडविण्याची धमकी दिली आहे. विशेष म्हणजे, जैशच्या त्याच पाकिस्तानातच कोटा रेल्वे स्थानकावर तेथील दहशतवाद्यांनी शनिवारी भीषण स्फोट घडवून आणला. या स्फोटात मोठ्या प्रमाणात जानमालाची हानी झाल्याचे सर्वश्रुत आहे.



**मोठा सशस्त्र बंदोबस्त**

शिर्षस्थ सूत्रांच्या माहितीनुसार, शनिवारी रात्री रेल्वे पोलीस महासंचालकांकडून रेल्वे पोलिसांना अलर्ट मिळाला. त्यानुसार, नागपूरसह ठिकठिकाणच्या रेल्वे स्थानकांवर हायअलर्टची स्थिती निर्माण झाली. डे-नाईट असे प्रत्येकी ४५ सशस्त्र अधिकारी-कर्मचाऱ्यांना आणि बॉम्ब शोधक तसेच नाशक पथकाला सुरक्षेसाठी रेल्वे स्थानक आणि परिसरात तैनात करण्यात आले. तेवढेच मणूष्यबळ रेल्वे सुरक्षा दलाकडूनही तैनात करण्यात आले.

### तो मनोरुग्ण, मात्र...

ऑक्टोबरमध्ये स्फोट घडवून आणन्याच्या धमकीसत्राने देशाच्या विमानसेवेचे पुरते आर्थिक कंबरडे मोडले. विविध विमान कंपन्यांना धमकीचे मेल पाठवून त्यांना बेजार करणारा जगदीश उईके याला नागपूर पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यानंतर प्राथमिक चौकशीत तो मनोरुग्ण असल्याचा अंदाज पोलिसांनी काढला. मात्र, त्याने केलेल्या उपद्रवामुळे विमान कंपन्यांना शेकडो कोटींचा फटका बसला. हजारो प्रवाशांचीही गैरसोय झाली.

# रेशनच्या बदल्यात 'व्होट'? नरेंद्र जिचकारांच्या प्रचाराच्या पत्रकांसोबत आढळल्या २२० किट बॅग्ज

## निवडणूक अधिकाऱ्यांची कारवाई : पश्चिमच्या उमेदवाराचा साठा उत्तर नागपुरात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नागपूर:** विधानसभा निवडणुकीच्या आदर्श आचारसंहितेत मतदारांना भुलविण्यासाठी कुठल्याही वस्तू, पैशांचे वाटप करता येत नाही असा नियम आहे. मात्र, उमेदवारांना आकर्षित करण्यासाठी रेशन किट तयार करण्यात आल्याची बाब समोर आली आहे. निवडणूक आयोगाच्या भरारी पथकाने कारवाई करत मोतीबाग सेंट्रल रेल्वे कॉलनीतील एका क्वॉर्टरच्या मोकळ्या भागातून २२० किट बॅग्ज जप्त केल्या आहेत. या बॅग्जमध्ये नागपूर पश्चिमचे अपक्ष उमेदवार नरेंद्र जिचकार यांचे प्रचारपत्रक आढळले आहे. नागपूर-पश्चिमच्या उमेदवाराच्या नावाचा साठा नागपूर-उत्तर मतदारसंघात आढळल्याने विविध प्रश्न उपस्थित होत आहेत.

मोतीबाग येथील सेंट्रल रेल्वे कॉलनीतील एका क्वॉर्टरमध्ये मोठ्या प्रमाणात रेशन किट असल्याची माहिती निवडणूक आयोगाला एका व्यक्तीने दिली. भरारी पथकाने तेथे जाऊन पाहणी केली असता क्वॉर्टरच्या मोकळ्या भागात २२० किट बॅग्ज असल्याची बाब स्पष्ट झाली. तातडीने जरीपटका पोलिस ठाण्याच्या पथकालादेखील बोलविण्यात आले. या बॅग्जची पाहणी केली असता त्यात नरेंद्र जिचकार यांचे प्रचारपत्रकदेखील आढळून आले.



हा सर्व माल जरीपटका पोलिस ठाण्यात पोहोचविण्यात आला. निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांकडून रात्री उशिरा तक्रार करण्याची प्रक्रिया सुरू होती. या मालाचा पंचनामा झाल्यावर तक्रार होईल व नंतर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया होईल, अशी माहिती जरीपटका पोलिस ठाण्याचे ठाणेदार अरुण क्षीरसागर यांनी दिली. यासंदर्भात नरेंद्र जिचकार यांच्याशी प्रतिक्रियेसाठी संपर्क होऊ शकला नाही.

### सरकारी क्वॉर्टरमध्ये किट्स कशा ?

संबंधित क्वॉर्टर रेल्वेचे होते व ते एका कर्मचाऱ्याला अलॉटदेखील झालेले आहे. त्या क्वॉर्टरसमोर मोकळी जागा असून तेथेच रविवारी एका गाडीतून रेशन किट्स उतरविण्यात आल्या. त्यानंतर याची माहिती निवडणूक आयोगाला देण्यात आली. सरकारी परिसराचा अशा पद्धतीने वापर करणे हादेखील आचारसंहितेचा भंग असल्याची माहिती निवडणूक अधिकाऱ्यांनी दिली.

### उत्तरमध्ये साठा का ?

दरम्यान, नरेंद्र जिचकार हे नागपूर-पश्चिम मतदारसंघाचे उमेदवार असताना त्यांच्या नावाच्या किट बॅग्ज नागपूर-उत्तरमधील भागात कशा काय ठेवण्यात आल्या याची चौकशी सुरू आहे.

## संजय गांधीनगर परिसरातील प्रचारयात्रेत

# 'निर्भय बनो, प्रीती बंड चुनो'ची धूम 'मातोश्री'च्या सन्मानासाठी लढा : 'डोअर टू डोअर' प्रचारावर भर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती** ६बडनेरा विधानसभेच्या लोकप्रिय अपक्ष उमेदवार लोकनेते माजी आमदार संजय बंड यांच्या पत्नी प्रीती संजय बंड यांच्या प्रचारयात्रेला शनिवारी संजय गांधीनगर येथून सुरुवात करण्यात आली. फ्रेजरपुरा, लुंबिनीनगर, किशोरनगर, पंचशीलनगर, प्रशांतनगर, वडरपुरा आदी भागांत 'डोअर टू डोअर' प्रचाराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यानंतर पदयात्रेचा समारोप नजीकच्या हनुमान मंदिर येथे झाला. पदयात्रेदरम्यान प्रीती बंड यांचे महिला मतदारांकडून औक्षण आणि स्वागत करून त्यांना आशीर्वाद देण्यात आला. बडनेरा मतदारसंघाच्या विकासासाठी प्रीती बंड यांच्याशिवाय पर्याय नसल्यामुळे त्या विधानसभा निवडणुकीत मोठ्या मताधिक्याने जिंकतील, असा विश्वास पदयात्रेदरम्यान नागरिकांनी व्यक्त केला. प्रत्येक प्रभागात प्रचार पदयात्रेला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याने त्या भावुकही झाल्याचे दिसून आले. याप्रचार रॅलीमध्ये राजेश वानखडे, ज्ञानेश्वर धाने पाटील, संदेश मेश्राम, कार्तिक गजभिये, रोहित लुचे, मुस्तफा लालुवाले, राजेंद्र दारोकार, वशीम चौधरी, वसीम बेनीवाले, रोशन चौधरी,फिरोज गोचेवाले, भोजा रायलीवाले, अन्वर कालीवाले, गुलाब चौधरी, सुभाष रायलीवाले, शकील रायलीवाले, अब्दुल नागीवाले, ऐजाज रायलीवाले, रहीम चौधरी, संजय पिंजरकर, पप्पू आवारे, संजय शेटे, प्रशांत दळवी,फिरोज कालीवाले, जावेद माजरे, जावेद चौधरी, बब्बूभाई लालुवाले, योगेश धर्माळे, रोशन चौधरी, राजू चौधरी, शहबाज चौधरी, सलमान चौधरी आदींसह असंख्य नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



### तरुणाईची 'ऑटोरिक्षा'ला पहिली पसंती

बडनेरा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार प्रीती बंड या 'ऑटोरिक्षा' या चिन्हावर निवडणूक लढवित आहेत. ऑटोरिक्षा हे कष्टकरी, श्रमजीवी, बेरोजगार तरुणांच्या उदरनिर्वाहचे साधन आहे. त्यामुळे 'ऑटोरिक्षा' या चिन्हाकडे गरीब, सामान्य वर्गाचे लक्ष लागून आहे. प्रीती बंड यांचे पती स्व. संजय बंड यांचा अनेक ऑटोरिक्षा चालकांसोबत स्नेह, जिव्हाळा होता. त्यामुळेच 'ऑटोरिक्षा'ला यंदाबडनेरा मतदारसंघात विशेषतः तरुणाई पहिली पसंती देत असल्याचे दिसून येत आहे. प्रीती बंड यांच्या प्रचारात नरुण वर्ग मोठ्या संख्येने स्वतः झोकून देत असल्याचे चित्र आहे.

# दिव्यांग, ज्येष्ठ ४२१ मतदारांच्या मतदानासाठी १४ पथके गठित

## पोस्टल बॅलेटची सुविधा, अचलपूर मतदारसंघात ३०९ मतदान केंद्रे



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अचलपूर :** विधान सभेच्या अचलपूर मतदारसंघातील निवडणुकीसाठीप्रशासनाने तयारी पूर्ण केली आहे. अचलपूर विधानसभा मतदारसंघामध्ये २ लाख ९२ हजार २४१ मतदार असून, त्यांच्यासाठी ३०९ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. दिव्यांग, ज्येष्ठ ४२१ मतदारांच्या बॅलेट पेपरद्वारे मतदानासाठी १४ पथके तैनात करण्यात आली आहेत. मुक्त आणि पारदर्शक वातावरणात निवडणुका होण्यासाठी प्रशासनाने आवश्यक तयारी पूर्ण केली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांनी दिली.

अचलपूर मतदारसंघामध्ये १ लाख ४८ हजार ९४७ पुरुष, तर १ लाख ४३ हजार २८९ महिला तसेच पाच इतर मतदार आहेत. त्यांच्यासाठी अचलपूर तालुक्यात १२१, तर चांदूर बाजार तालुक्यात १८८ मतदान केंद्रे आहेत. मतदान केंद्राध्यक्ष व इतर मतदान

बैठकीला संबोधित करतांना अचलपूरचे एसडीओ बळवंत अरखराव व अन्यअधिकाऱ्यांसह १३७६ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामध्ये २६ झोनल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ८५ वर्षांवरील व दिव्यांग अशा ४२१ मतदारांकडून पोस्टल बॅलेटचे अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यांच्या मतदानाकरिता एकूण १४ पथके तयार करण्यात आली आहेत. त्यामुळे ज्येष्ठांना व दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रावर जाण्याची आवश्यकता नाही. घरीच बसून त्यांना मतदानाचा हक्क बजावता येणार आहे, अशी माहिती उपविभागीय अधिकारी प्रशासनाकडून देण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय महसूल अधिकारी बळवंत अरखराव, सहायक निवडणूक अधिकारी डॉ. संजय गरकल धीरजकुमार गोहाड, रामदास शेळके, नायब तहसीलदार अक्षय मांडवे, नायब तहसीलदार मनीष देशमुख, जगदीश मंडपे यांच्यासह महसूल कर्मचारी, कार्यालयीन कर्मचारी जबाबदारी सांभाळत आहेत. दरम्यान, आगामी विधानसभा निवडणुकी करिता अचलपुरात कायदा व सुव्यवस्था राहावी, याकरता अचलपूर पोलिसांनी संवेदनशील भागातून रूट मार्च काढला.

# नोटांचा चुरा भरलेला ट्रक पेटला, तर्कवितर्क सुरू

## वर्धा जिल्ह्यातील कांढळी-बरबटी गावाजवळ लागली आग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ वर्धा:** भारतीय चलनातील नोटांचा चुरा (स्क्रॅप) भरुन उत्तरप्रदेशला जाणाऱ्या ट्रकला वर्धा जिल्ह्यातील कांढळी-बरबटी गावाजवळ आग लागली. या आगेत नोटांचा चुरा जळून खाक झाला. ही घटना रविवारी सकाळी घडली. ट्रक भरून नोटा जळाल्याची माहिती पसरल्यामुळे गावकऱ्यांसह वाहनचालकांनीही गाड्या थांबवून गर्दी केली. तातडीने पोलीस, प्रशासकीय यंत्रणा घटनास्थळी पोहोचली. दरम्यान घटनेची माहिती मिळताच आसपासच्या गावातील लोकांनी या ठिकाणी गर्दी केली. तर्कवितर्क लावले जाऊ लागले.

विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना ठिकठिकाणी पोलिसांच्या तपासणीत मोठ्या प्रमाणावर रोकड पकडली जात आहे. १६ चाकांचा ट्रक (यूपी १२ सिटी ५३२७) हैदराबाद येथून उत्तरप्रदेश-मुजफ्फरनगरच्या दिशेने जात होता. या ट्रकमध्ये विविध प्रकारच्या नोटांचा तुकड्यांचा कचरा (स्क्रॅप) होता. वर्धा जिल्ह्यातील कांढळी गावाजवळून ट्रक जात असताना शॉर्टसर्किटने या ट्रकला आग लागली. त्यामुळे आतील नोटांच्या कचरा जळून खाक झाला. दरम्यान, अग्नीशमन दलाच्या वाहनांनी आग विझविण्याचा प्रयत्न केला. रिझर्व्ह बँकेने अलीकडेच या स्क्रॅप मालाचा लिलाव केला होता. त्यानुसार, हा माल नेला जात होता. वर्धा जिल्ह्यातील सिंदी पोलीस यासंदर्भात अधिक तपास करीत आहेत. ट्रकचालक जसवंतसिंह त्रिलोकसिंह (४५, मेरठ-उत्तरप्रदेश) आणि सहकारी भोपाळ दत्ताराम या दोघांनाही पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले होते. त्यांनी भारतीय चलनी नोटांचा कचरा असल्याचे पोलिसांना सांगितले.



सध्या विधानसभा निवडणुकीची धामधूम सुरु आहे. त्यातही राज्यभर लाखो रुपये निवडणूक अधिकाऱ्यांच्या पथकांकडून जप्त केले जात आहेत. मतदारांना आमिष दाखवून किंवा पैसे देऊन मत मिळविण्याचा प्रयत्न होऊ नये म्हणून पोलीस आणि जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. त्यातच ट्रकभर नोटा असलेल्या ट्रकचा अपघात झाला आणि ट्रकमधील नोटांना आग लागल्याची अफवा पसरली. त्यामुळे बरबटी-कांढळीसह अन्य आजुबाजूंच्या गावाजवळील नागरिकांनी अपघातस्थळावर एकच गर्दी केली. मात्र, जळालेल्या नोटा नसून नोटांचा कचरा असल्याचे लक्षात आल्यानंतर अनेकांचा भ्रमनिरास झाला. त्यामुळे अनेक जण आल्यापावली परत गेले.

# बंडखोरांना काँग्रेसचा दणका!

## पक्षातून २८ जणांचे ६ वर्षासाठी निलंबन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११मुंबई–** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने (एमपीसीसी) रविवारी (दि.१०) रात्री आगामी विधानसभा निवडणुकीपूर्वी पक्षाची शिस्तभंग करणाऱ्यांवर कारवाई केली. यावेळी पक्षामधून एकूण २२ बंडखोरांना ६ वर्षासाठी पक्षातून निलंबित करण्यात आले आहे.

अशा आशयाचे निवेदन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने काढले आहे. यामध्ये पक्षाच्या सोबत शिस्तभंग केल्यामुळे ही तीव्र कारवाई केली, असे म्हंटले आहे.

सुरुवातीला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने २१ इतर बंडखोरांना निलंबित केले होते. यानंतर त्यांनी आणखी ७ जणांना पक्षातून बाहेरचा रस्ता दाखवला. त्यामुळे आता निलंबित केलेल्यांची संख्या २८ वर पोहचली आहे. २२ मतदारसंघात निलंबनाची संख्या २८ झाली आहे. हे निलंबित उमेदवार महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवारांविरुद्ध निवडणूक लढवत आहेत. यापूर्वी, काँग्रेस नेते रमेश चेन्निथला म्हणाले होते की अधिकृत 'मविआ' उमेदवारांविरुद्ध लढणाऱ्या सर्व पक्षीय बंडखोरांना सहा वर्षांच्या निलंबनाला सामोरे जावे लागेल.



आनंदराव गेडाम, शिलू चिमुरकर, सोनल कोवे, भरत येरमे, अभिलाषा गावतुरे, प्रेमसागर गणवीर, अजय लांजेवार, विलास पाटील, आस्मा जावद चिखलेकर, हंसकुमार पांडे, कमल व्यवहारे, मोहनराव दांडेकर, मंगलराव दांडेकर, मोहनराव दांडेकर यांचा समावेश आहे. मनोज शिंदे, सुरेश पाटीलखेडे, विजय खडसे, शाबीर खान, अविनाश लाड, याज्ञवल्य जिचकार, राजू झोडे, राजेंद्र मुका, शामकांत सनेर, राजेंद्र ठाकूर, आबा बागुल, मनीष आनंद, सुरेश कुमार जेथलिया, कल्याण बोराडे आणि चंद्रपॉल चौकसे यां सर्वांना पक्षातून ६ वर्षासाठी निलंबित करण्यात आले आहे.

# महाविकास आघाडीचा जाहीरनामा केवळ घोषणा, बावनकुळेंची टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ नागपूर–** महाविकास आघाडीचा जाहीरनाम्यामध्ये केवळ घोषणा असून त्यावर कोणी विश्वास ठेवणार नाही. मुळातच काँग्रेसचे रक्त हे विकास करण्याचे नाही तर केवळ घोषणा करण्याचे आहे, अशी टीका भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे नागपुरात आले असता ते प्रसार माध्यमांशी बोलत होते. काँग्रेसने आजपर्यंत निवडणुकीच्या निमित्ताने जाहीर केलेली एकही गोष्ट पूर्ण केली नाही. त्यामुळे त्यांचा जाहीरनामा म्हणजे केवळ घोषणा असल्याची टीका त्यांनी केली.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मल्लिकार्जुन खरगे मतांसाठी काहीही बोलतात, त्यामुळे त्यांच्याकडे आम्ही गांभीर्याने बघत नाही. संघात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो नसल्याचे ते म्हणाले, मात्र ते कधी संघ मुख्यालयात जाऊन आले का ? त्यांच्याकडे दुर्बिण आहे का. खर्गेनी एकदा तरी संघ कार्यालयात येऊन बघावं तिथे काय काय आहे. संघावर टीका करण्यापेक्षा खरगे यांनी संघ काय जाणून घेतले तर त्यांना संघ कळेल, असेही बावनकुळे म्हणाले. हरियाणामध्ये काय झाले हे देशाने बघितले आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली जात असली तरी ते विश्व गौरव पुरुष असल्याचे बावनकुळे म्हणाले.

राज्य सरकारने महिलासह युवक व शेतकऱ्यांसाठी विविध योजना जाहीर केल्यानंतर त्याचा लाभ मिळतो आहे, मात्र आता केवळ मताच्या भीतीपोटी काँग्रेसने पुन्हा हा खोटारडेपणा सुरू केला, अशी टीका बावनकुळे यांनी केली.




# ‘चिखलदरा स्कायवॉकचे काम महाविकास आघाडीने थांबविले’, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीसांचा आरोप



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११चिखलदरा**


चिखलदरा येथील स्कायवॉकचे काम पूर्ण होत आले आहे. माजी खासदार नवनीत राणा यांनी सोबतच केबल कारची देखील मागणी केली आहे. या दोन गोष्टी जर एकत्र असतील, तर पर्यटकांचा ओघ मेळघाटात वाढणार आहे. याचा प्रस्ताव तयार करा, ते पूर्ण करण्याची जबाबदारी मी स्वीकारतो. २०१४ ते २०१९ पर्यंत मी मुख्यमंत्री असताना मेळघाटात मोठ्या प्रमाणावर विकास कामे हाती घेण्यात आली, पण राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर ही सर्व कामे थांबविण्यात आली. अडीच वर्षे चिखलदरा येथील स्कायवॉकचे काम थांबविण्याचे पाप महाविकास आघाडी सरकारने केले, असा आरोप उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धारणी येथे बोलताना केला.

मेळघाटचे भाजपचे उमेदवार केवलराम काळे यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते. सभेला खासदार नवनीत राणा, माजी आमदार प्रभुदास भिलावेकर, रमेश मावस्कर आदी उपस्थित होते.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाविकास आघाडी सरकारने विकास कामांमध्ये अडथळे आणण्याचे काम केले. स्कायवॉकचे थांबलेले काम आमच्या सरकारने सुरू केले आणि ते आता पूर्णत्वास देखील आले आहे. आमच्या सरकारने आदिवासींसाठी बिरसा मुंडा योजना आणली आणि चार हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. मेळघाटात रस्ते, वीज, पाणी आणि घरे उपलब्ध करून देण्यासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत.

सरकार कोट्यवधी रुपयांचा निधी देणार आहे, पण तो जनतेपर्यंत पोहचायला हवा. कमिशनखोर आमदार असेल, तर लोकांपर्यंत विकास पोहचू शकणार नाही, त्यामुळे भाजपचाच आमदार निवडून द्यावा, असे आवाहन देवेंद्र फडणवीस यांनी केले.

## नवनीत राणा आधुनिक झाशीची राणी



माझ्या आजोबांचं घरसुद्धा मेळघाटमध्ये होतं. नवनीत राणा येथील मुलगी आहे. मेळघाटमध्ये नवनीत राणा यांना तुम्ही लीड दिला. मी तुम्हाला रामराम करतो, असे उपमुख्यमंत्रीदेवेंद्र फडणवीस येथील प्रचारसभेत म्हणाले. यावेळी फडणवीस यांनी माजी खासदार नवनीत राणा यांचा आधुनिक झाशीची राणी म्हणून उल्लेख केला. नवनीत राणा यांनी मेळघाटसाठी केलेल्या सर्व मागण्या पूर्ण करु, असे आश्वासन त्यांनी जनतेला दिले.

## वनविभागाच्या कार्यपद्धतीवर टीका

वनविभागाचे काही अधिकारी हे आदिवासींना त्रास देण्याचे काम करीत आहेत. काही चांगले कर्मचारी देखील आहेत. त्यांना त्यांचे काम करायचे आहे. यापुढे कोणत्याही गोपालक आदिवासींना त्यांच्या गायींच्या चराईसाठी त्रास होणार नाही, याचा बंदोबस्त केला जाईल, असे आश्वासन देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मेळघाटात गवळी बांधवांसाठी बचत गटाच्या माध्यमातून सहकारी तत्वावर दूध प्रक्रिया उद्योग स्थापन करण्याची सूचना फडणवीस यांनी नवनीत राणा यांना केली. या उद्योगासाठी १०० टक्के अनुदान देण्याचे आश्वासन देखील त्यांनी दिले. महाविकास आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे लोक हे विकास विरोधी आहेत. या सावत्र भावांनी लाडकी बहीण योजनेत अडथळे आणण्याचा प्रयत्न केला, पण न्यायालयाने देखील ही योजना बंद करू दिली नाही, असे फडणवीस यांनी सांगितले.

# वलगाव येथील यशोमती ठाकूर यांचे अज्ञात व्यक्तीने फाडले बॅनर




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

अमरावती तालुक्यातील वलगाव येथे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या तिवसा विधानसभा मतदारसंघाच्या उमेदवार यशोमती ठाकूर यांचे प्रचार बॅनर वलगाव येथे अहिल्याबाई चौक धनगर पुरा येथे लावण्यात आले होते मात्र दिनांक १० नोव्हेंबर रविवार रोजी रात्रीच्या सुमारास अज्ञात व्यक्तीकडून वलगाव येथील यशोमती ठाकूर यांचे प्रचार बॅनर अज्ञात व्यक्तीकडून फाडण्यात आले आहे ही घटना सोमवार ११ रोजी सकाळी सातच्या सुमारास हि घटना उघडकीस आली आहे हि सर्व घटना काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना माहीत पडताच त्यानी वलगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे पोलीसांकडे तक्रार दाखल होताच पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली व आजुबाजूच्या परिसरात कसुन चौकशी चालू केली आहे वलगाव येथील अहिल्याबाई चौक धनगर पुरा येथे हे बॅनर लावण्यात आले होते पुढील तपास वलगाव पोलीस करत आहे.

# संकल्पपत्रातून विद्यार्थ्यांचे पालकांना मतदान करण्याचे आवाहन

## अमरावती पं. समिती स्वीप कक्षाचा अभिनव उपक्रम पालकांनी दिले मतदान करण्याचे पाल्याला वचन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ अमरावती**

मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी तालुक्यातील विविध खासगी व जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांना स्वहस्ताक्षरातील संकल्पपत्रे लिहून मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्यामुळे घराघरात मतदान जनजागृती होत असून या अभिनव उपक्रमाला ग्रामिण भागात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्विप अंतर्गत नोडल अधिकारी तथा मुख्य कार्यपालन अधिकारी संजिता मोहपात्र, शिक्षणाधिकारी बुद्धभूषण सोनोने यांच्या मार्गदर्शनात जिल्ह्यातील विविध विधानसभा मतदार संघात मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहे.

अमरावती पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुदर्शन तुपे व तालुका नोडल अधिकारी तथा



गटशिक्षणाधिकारी धनंजय वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्विप कक्षाच्या नियोजनानुसार तालुक्यातील कस्तुरबाई जैन विद्यालय शिराळा, इंदिरा कन्या विद्यालय शिराळा, वसंत बाबा विद्यालय देवरा, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा अंतोरा या शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांना स्वहस्ताक्षरातील संकल्पपत्र लिहून येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मतदान करण्याचे आवाहन आपापल्या पालकांना केले. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत पालकांनीदेखील संकल्पपत्रावर स्वाक्षरी करून मतदान करण्याचे वचन दिले. या अभिनव उपक्रमाला ग्रामिण भागात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

या अभिनव उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षण विस्तार अधिकारी सुधिर खोडे, अजित पाटील, केंद्रप्रमुख सुभाष सहारे, स्विप कक्षाचे विनायक लकडे, अफसर खान, शेख कौसर, सर्व केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक, अंगणवाडी सेविका, बचत गटाच्या महिला, आशा वर्कर परिश्रम घेत आहे. अशी माहिती स्विपचे प्रसिद्धीप्रमुख विनायक लकडे यांनी दिली.

मतदार जनजागृती उपक्रमाअंतर्गत तालुक्यातील सर्व माध्यमांच्या शाळांनी विद्यार्थ्यांच्या स्वहस्ताक्षरात संकल्पपत्रे लिहून पालकांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात यावे. तसेच सदर पत्रावर पालकांची स्वाक्षरीदेखील घेण्याचे आवाहन तालुका नोडल अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी धनंजय वानखडे यांनी केले आहे.

# महेंद्र कॉलनी -गणेश पेठ भागात जनआशीर्वाद यात्रेतुन स्थानिकांशी संवाद



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ अमरावती**


आजच्या आधुनिक युगात संगणक व मोबाईल क्रांतीमुळे माहिती, संवाद व शिक्षण अश्या अनेक बाबी आज जनतेला सहज उपलब्ध झाल्या आहे. ऑनलाईन पद्धतीचा जीवनात प्रत्यक्ष वापर होत असल्याने प्रत्येकाने डिजिटलाझेशनची कास धरली आहे. नव्या डिजिटल युगात नव्या प्रगत संधी उपलब्ध होण्यासाठी व अत्याधुनिक तंत्रज्ञानातून विकासाला चालना देण्याकरिता एक नियोजित कृती कार्यक्रम तयार करण्यात आला आहे. आगामी काळात याला मूर्त रूप मिळण्यासाठी सर्वांची साथ मोलाची आहे. जनतेच्या जीवनात डिजिटल क्रांतीतून विकासाला आकार देत त्यांच्या जीवनात नवा बदल घडविण्यासाठी आपण प्रयत्नरत असल्याची ग्वाही महायुतीच्या उमेदवार सौ.सुलभाताई संजय खोडके यांनी दिली. आगामी २० नोव्हेंबर २०२४ रोजी होऊ घातलेल्या अमरावती विधानसभा मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, भारतीय जनता पार्टी, शिवसेना , रिपाई (आठवले गट ) , पीरिपा व मित्र पक्ष, महायुतीच्या अधिकृत उमेदवार सौ.सुलभाताई संजय खोडके यांच्या प्रचारार्थ प्रभागा -प्रभागात सुरु असलेल्या जनआशीर्वाद यात्रेने चांगलाच जोर धरला आहे. सर्वसमावेशक जनतेच्या वाढत्या अभूतपूर्व प्रतिसादात सुलभाताईंनी महेंद्र कॉलनी प्रभागातील गणेश पेठ,प्रवीण नगर, नरेडी नगर , अमर नगर , छत्रसाल नगर आदी भागातील नागरिकनांशी संवाद साधून त्यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी महायुतीच्या उमेदवार सौ. सुलभाताई खोडके यांनी मतदारांशी संवाद साधून आगामी निवडणुकीत विजयी करण्याचे आवाहन केले. मागील काळात आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी स्थानिक भागात विकासाची गंगाचं खेचून आणल्याने परिसराला नवी चकाकी आली आहे. पायाभूत सुविधांच्या पूर्ततेतून जनतेचे जीवनमान उंचावले असल्याने यातून आर्थिक , सामाजिक , सांस्कृतिक , शैक्षणिक व क्रीडा अश्या सर्वांगीण विकासाला बळकटी व गती मिळाली आहे. त्यामुळे अमरावतीच्या विकासासाठी सुलभाताई सक्षम उमेदवार असल्याचा एकसुर यावेळी स्थानिक नागरिकांमध्ये उमटला होता. दरम्यान महिलांनी सुलभाताईंचे औक्षण करून सत्कार केला. यावेळी जेष्ठ नागरिकांची सुद्धा भरपूर साथ लाभली.जनतेनी वेळोवेळी केलेले सहकार्य,दिलेली अखंडितपणे साथ,आपुलकी-जिव्हाळा ही सकारात्मक आणि सर्जनशील शक्ती आपणाला क्षणोक्षणी प्रेरणादायी व उर्जादायी ठरली आहे.

# नेत्याचा स्वागतासाठी सार्वजनीक ठिकाणी लावलेले फ्लेक्स व झेंडे २ तासात काढले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ मोर्शी**

सध्या मोर्शी विधानसभा मतदार संघात सर्व उमेदवारांचा प्रचार जोरात सुरू आहे त्याचबरोबर विविध नेत्यांची सभा व रोड शो सुद्धा घेण्यात येत आहे. मात्र या दरम्यान जाहिराती करताना सार्वजनीक ठिकाणी लावण्यात आलेले पक्षाचे झेंडे व नेत्यांचे बॅनर निवडणूक विभागाने २ तासात काढले.

मोशी शहरात आज दि.११ नोव्हेंबरला आज राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची जाहीर सभा आयोजित केलेली होती. त्यानिमित्त मोर्शी मतदार संघात अजित पवार गटाचे उमेदवार देवेंद्र भुयार यांनी आपल्या पक्षाच्या नेत्याला खुश करण्यासाठी मोर्शी शहराच्या मुख्य रस्त्यावर असलेल्या रोड दुभाजकाच्या खांबावरच नेत्याचे फ्लेक्स असलेले बॅनर लावलेले होते. त्याचबरोबर रस्ता दुभाजकाच्या दोन्ही लोखंडी ग्रील वर झेंडे लावून पक्षाचा प्रचार सुद्धा



केलेला होता. मात्र त्यांना आयोगाचे नियम माहित नसल्याचे यावेळी सिद्ध झाले . दिनांक ११ ला सकाळीच मोर्शी शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती, छत्रपती शिवाजी महाराज चौक, एसटी बस स्थानक, जयस्तंभ चौक ते रामजी बाबा चौकापर्यंतच्या मुख्य रस्त्यावर सर्वत्र झेंडे व फ्लेक्स दिसून येत होते.ही माहिती निवडणूक विभागाला माहीत होताच त्यांनी आपल्या पथकासह झेंडे व बॅनर काढले.त्याचबरोबर रामजी बाबा चौकात पथदिव्याच्या खांबावर मोठे लाऊडस्पीकर सुद्धा लावण्यात आले होते.

# जेवड नगर,गोपाल नगर,माया नगर परिसरात नितीन कदम यांचा प्रचाराचा एल्गार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११ अमरावती**

संकल्प शेतकरी संघटनेचे अध्यक्ष व बडनेरा विधानसभा मतदार संघाचे अपक्ष लोकप्रिय उमेदवार नितीन कदम यांच्या प्रचारार्थ दस्तूर नगर,जेवड नगर,गोपाल नगर,माया नगर,पवन नगर,भारत माता चौक,कुंभारवाडा,मराठा कॉलनी,मेहेरबाबा कॉलनी,फॉरेष्ट कॉलनी,जयंत कॉलनी व इतर ठिकाणी झालेल्या प्रचार रॅलीला जनसमान्यांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. सदर परिसरात झंझावाती प्रचार करून मतदारांशी संवाद साधला. यावेळी मतदारांनी नितीन कदम यांना आशीर्वाद देऊन भक्कम पाठबळ असल्याची ग्वाही दिली.बडनेरा विधानसभा मतदार संघात नितीन कदम यांच्या भव्य स्वरूपाच्या पदयात्रेला मिळणारा प्रतिसाद बघता विरोधकांना गोंधळात पडल्याच चित्र मतदार संघात आहे.सकाळी ९ वाजतापासून सुरू झालेली ही प्रचार पदयात्रेचा शेवट सायंकाळी ५ वाजेपर्यंत चालणाऱ्या पदयात्रेच्या प्रवासात नागरिकांच्या मूलभूत समस्या; वीज पाणी,स्वच्छता शिक्षण, आरोग्य, रोजगार, निवारा, औद्योगीकरण,नगर विकास,रस्ते,पथडिवे,स्त्री सशक्तीकरण व अश्याच विविध मुद्द्यांना अनुसरून नागरिकांशी संवाद साधत मतदारांना आकर्षित करीत आहेत. सदर उल्लेख केलेल्या परिसरातील नगरिकांनीही



उत्स्फूर्त प्रतिसाद देत आमचे मत विकासालाच असून, नितीन कदम यांना मोठ्या मताधिक्याने निवडून देण्याचे आश्वासन दिले. एकप्रकारे बडनेरा क्षेत्रातील भ्रष्टाचार, दहशतवाद आणि मनमानी कारभाराला लगाम कसण्यासाठी यांच्या नितीन कदम यांच्या माध्यमातून तगडे आव्हान विरोधकासामोरे आहे. प्रचार रॅलीमध्ये पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच तरुणांसह ज्येष्ठ नागरीकांनी या रॅलीत सहभाग घेतला. यावेळी नितीन कदम यांना बडनेरा विधानसभा मतदार संघातून बहुमताने विजयी करण्यासाठी येत्या २० तारखेला ट्रंपेट या निशाणी समोरील बटण दाबून विजयी करण्याचे आवाहन मतदारांना करण्यात आले.

# जनतेचे प्रेम आणि विश्वास लाख मोलाची शिदोरी : यशोमती ठाकूर

## नेर पिंगळाई येथील प्रचार कार्यालयाचे थाटात उद्घाटन : नागरिकांचा मिळतोय उदंड प्रतिसाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नेर पिंगळाई**

२५लोकांचे माझ्यावरील प्रेम आणि त्यांचा विश्वास ही माझ्यासाठी लाखमोलाची शिदोरी आहे.मी जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही,परमेश्वराने माझ्यामागे ही जी भक्कम साथ उभी केली ही निरंतर राहील,असे अभिवचन महाविकास आघाडीच्या उमेदवार यशोमती ठाकूर यांनी दिले. नेर पिंगळाई येथील प्रचार कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या.तिवसा मतदार संघातील महाविकास आघाडीच्या उमेदवार यशोमती ठाकूर यांच्या प्रचारार्थ नेर पिंगळाई येथे प्रचार कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी परिसरातील हजारो नागरिकांनी उपस्थिती लावून यशोमती ठाकूर यांना समर्थन दिले. नागरिक मोठ्या संख्येने प्रचाराला उपस्थित राहत असल्याने ठाकूर यांनी त्यांचे आभार मानले. यावेळी नागरिकांनी यशोमती ठाकूर यांच्या प्रचाराला उदंड प्रतिसाद देत त्यांचे जंगी स्वागत



केले. उपस्थित हजारो नागरिकांनी यशोमती ठाकूर यांच्यावर पुष्पवृष्टी करत त्यांना दणदणीत समर्थन दर्शविले. मोर्शी तालुक्यातील नेरपिंगळाई येथे देवीचे दर्शन घेऊन यशोमती ठाकूर यांनी प्रचार यात्रा काढली. गावातील हजारो महिलांनी रस्त्यावर येत यशोमती ठाकूर यांचे जंगी स्वागत केले. आपल्या लाडक्या लोकनेत्या यशोमती ताईंना समर्थन देण्यासाठी लोकांची तोबा गर्दी झाली होती. तिवसा विधानसभा मतदार संघातील प्रत्येक गावात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याने यशोमती ठाकूर या चौथ्यांदा मोठ्या मताधिक्याने निवडून येथील अशी चर्चा नागरिकांमध्ये होत आहे. यशोमती ठाकूर यांच्या प्रचार यात्रेत होत असलेली गर्दी पाहून विरोधकांचे धाबे दणाणले आहे. तिवसा मतदारसंघात यशोमती ठाकूर यांनी मोठा विकास केला आहे. प्रत्येक गावात विविध योजना राबवून गाव पातळीवरील विकास, ही त्यांच्या कामाची पावती आहे. त्यामुळे याही वेळेस या भागातील जनता त्यांना निवडून देतील अशी प्रतिक्रिया नागरिकांनी दिली.यशोमती ठाकूर यांना आम्ही अनेक वर्षापासून ओळखतो.त्या आमच्या गावचा आणखीन विकास करतील, त्यांना आम्हाला मोठ्या पदावर बघायचे आहे. विदर्भाला त्यांच्या रूपाने सक्षम नेतृत्व लाभलं, हे नेतृत्व जपलं पाहिजे आणि त्यांना आपण साथ दिली पाहिजे असा सूर महिला वर्गामध्ये होता. केवळ जिल्हा पुरतेच नव्हे तर, राज्याच नेतृत्व करण्याची क्षमता यशोमती ठाकूरमध्ये आहे.त्यामुळे त्यांना भक्कम साथ द्या आणि निवडून आणा असे आवाहन उपस्थित नागरिकांना गावकऱ्यांनीच केले.प्रचार कार्यालय उद्घाटन प्रसंगी काँग्रेसचे मोर्शी तालुका अध्यक्ष रमेश काळे, बाळासाहेब पुंड, संजय मंगळे,रमेश टोपले, मनोज टेकाडे, गजानन ठवळी,महेश राऊत,प्रवीण काळमेघ,श्याम बेलसरे,संजय कुरळकर, पंजाबराव वानखडे, सुनील वांगे, पवन काळमेघ,निलेश तट्ठे,वैभव ढोरे,तायवाडे,चेतन वानखडे, प्रतीक घोरमाडे, बंटी वानखडे, तनय वानखडे, केतन अलोने, तेजस गोहत्रे,संजय पुंड, राजूभाऊ डहाणे, सुरज अवचार, अतुल खोडसकर ,साजिद पठाण, सुनील डहाके,माधव टोपले, अश्विन कुरपडे ,किशोर पाटील,प्रवीण बडासे, मनीष देशमुख, बंडूभाऊ कनेर, प्रमोद गावंडे, विपिन ढोके, अनिकेत तायवाडे,कुणाल तायवाडे, राजूभाऊ पराडे,यांची प्रमुख उपस्थिती होती.




# बच्चू कडू यांच्या प्रचाराची धुरा महिलाशक्तीच्या खांद्यावर

## महिला भगिनी स्वयंस्फूर्तीने गावागावात करताहेत प्रचार



### जनसामान्यांमधून बच्चू कडू यांना प्रतिसाद

अचलपूर मतदार संघात बच्चू कडू यांना ओळखत नाही असा एकही व्यक्ती नाही. वीस वर्षांपासून सलग आमदार असलेले बच्चू कडू यांच्या सामाजिक कार्याचे प्रत्येक गावात अनेक उदाहरणे आहेत.बच्चू कडू यांनी परिवर्तन महाशक्ती स्थापन केल्यामुळे राज्यात ज्या ठिकाणी उमेदवार उभे केलेत त्यांनाही वेळ द्यावा लागतो त्यामुळे बच्चू कडू यांची प्रतीक्षा न करता गावागावातील महिला, पुरुष, युवकांनी स्वतःच ही निवडणूक खांद्यावर घेऊन प्रचाराला सुरुवात केली. एखाद्या लोकनेत्याप्रति एवढा आदर केवळ अचलपूर मतदार संघातच पाहायला मिळत आहे हे विशेष!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११चांदुर बाजार**

साडी,किराणाची लालसा न दाखवता बच्चू कडू कायम गोरगरिब,दिव्यांग स्वतःच्या पायावर उभे राहावे यासाठी प्रयत्नशील असतात.बच्चू कडू यांच्या माध्यमातून अनेक संकटात सापडलेले महिला कुटुंब स्वतःच्या पायावर उभे राहून त्यांनी आर्थिक उन्नती साधली यामुळेच पुन्हा बच्चू कडू यांनी आपले आणि आपल्या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करावे यासाठी बच्चू कडू यांच्या आदेशाची वाट न पाहता महिलांनी स्वतः प्रचाराची धुरा आपल्या खांद्यावर घेऊन गावागावात बच्चू कडू यांचा स्वयंस्फूर्तीने प्रचार करत आहे. चांदुरबाजार तालुक्यातील टाकरखेडा,आसेगाव या परिसरातील महिला भगिनींनी प्रत्येक घरी जाऊन बच्चू कडू यांनी केलेल्या कार्याची माहिती जनतेपर्यंत पोहचवता आहेत.प्रचारात विधवा, परितक्त्या,दिव्याग, महिलांचा मोठ्या प्रमाणात समावेश आहे. कुटुंबावर कुठल्याही प्रकारचे संकट आल्यास त्या कुटुंबाचे संकटमोचक म्हणून बच्चू कडू सदैव उभे असतात, अनेक संकटात सापडलेल्या कुटुंबाचे पालकत्व सुद्धा बच्चू कडू यांनी स्वीकारलेले आहे.शेतकरी आत्महत्येनंतर त्या कुटुंबातील सदस्यांना सन्मान देण्याचे काम बच्चू कडू यांनी केले असून अनेक आत्महत्याग्रस्त कुटुंबांना स्वतःच्या पायावर उभे करण्यात प्रहार जनशक्ती पक्षाची मोठी भूमिका असल्याचे या महिला नागरिकांना पटवून देत आहे. बच्चू कडू प्रचारात व्यस्त असल्याने प्रत्येक गावात पोहचणे कठीण आहे त्यामुळे महिला वर्गाने पुढाकार घेऊन गावागावात आणि घरोघरी जाऊन त्या बच्चू कडू यांचा प्रचार करत आहे. बच्चू कडू यांना कोणत्याही प्रचाराची गरज नसून बच्चू कडू हे आमच्या मनातील नेते आहेत आणि त्यांचा विजय पक्का आहे अश्या भावना यावेळी सर्वसामान्य नागरीक बोलून दाखवत आहेत.या प्रचार रॅली मध्ये प्रहार महिला तालुका आघाडीच्या स्टेला मॅडम, दीपा तंतरपाळे, पल्लवी खैरकर, शारदा सहारे,अनिता धाकडे, दीपा धाकडे, सीमा वानखडे, वर्षा मोरे, शालुताई टेकाम, नीता सरदार, सीमा बादशे यांच्यासह गावातील अनेक महिलांचा स्वयंस्फूर्तीने सहभाग आहे.

# वेळातला वेळ काढून खासदार नियमित वाचतात विदर्भ प्रजासत्ताक........



सध्या संपूर्ण राज्या सह अमरावती जिल्ह्यात निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी जोरदार सुरूआहे . जिल्ह्यात सर्वत्र पदयात्रा,बाईक रॅली,जाहीर सभा सुरु आहेत अश्या परिस्थितीत ही वेळातला वेळ काढून अमरावती जिल्ह्याचे खासदार बळवंत वानखडे हे आवर्जून सांध्य मराठी दैनिक विदर्भ प्रजासत्ताक वर एक नजर मारून जिल्ह्यातील राजकीय बातम्यांचा नियमित आढावा घेतात.

# परिवर्तनरुपी विकासासाठी प्रितीताई संजय बंड अत्यावश्यक

## रवी नगर येथील नागरिकांनी व्यक्त केले मत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ अमरावती**

गेल्या अनेक वर्षापासून बडनेरा मतदार संघातील विकास खुंटला असून,बेरोजगारी, उद्योगधंद्याची पीछेहाट,नागरी समस्या,सरकारी जमिनीचे काळे चिठ्ठे,आदी समस्यांपासून सामान्य मतदार रंजला गांजला आहे.अशा सामान्य मतदाराच्या सर्वांगीण विकासासाठी बडनेरा विधानसभा मतदारसंघात परिवर्तनाची लाट असून या लाटेवर मतदार संघातील अपक्ष उमेदवार प्रितीताई संजय बंड याच स्वार होणार असल्याचे मत प्रभागातील मतदार नागरिक व्यक्त करत आहेत.बडनेरा विधानसभा मतदारसंघाच्या एकमेव महीला अपक्ष उमेदवार प्रितीताई संजय बंड यांनी रविवारी व्यापक जनसंपर्क अभियान रवीनगर येथे सकाळ पासुन दुपार पर्यत राबवून मतदारांशी प्रत्यक्ष संवाद साधला.अनेक मतदारांनी यावेळी प्रितीताई संजय बंड यांचे घरोघरी उत्स्फूर्त स्वागत करीत परिवर्तनासाठी आपण अत्यावश्यक असल्याचे मत यावेळी व्यक्त केले.सकाळी रविवारी ८ वाजता श्री.संत ज्ञानेश्वर मंदिर येथून या झंझावाती प्रचार अभियानाचा शेकडो कार्यकर्त्यांच्या समवेत प्रारंभ केला. परिसरातील अनेक मतदारांच्या घरोघरी संपर्क साधित त्यांची आस्थेने विचारपूस करित ही प्रचार पदयात्रा महेश्वर मंदिर,राम मंदिर,गजानन महाराज मंदिर, हनुमान मंदिर परिसर, छांगाणी नगर, न्यू छांगाणी नगर,न्यू रवी नगर,न्यू गणेश कॉलनी,अंबा विहार,पार्वती नगर मार्गे महेश नगर येथे पोहोचली.येथील उपस्थित असलेल्या नागरिकांच्या समस्या जाणून घेत त्यांच्याशी संवाद साधन्या आला. येत्या विधानसभा निवडणुकीत प्रितीताई बंड यांना निवडून आणणे ही ही सर्वांची जबाबदारी असून त्यासाठी आम्ही सर्व मतदार कटीबद्ध असल्याचे यावेळी अनेक मतदारांनी सांगितले.

# अंजनगाव सुर्जी येथे महारॅलीत बुंदिले यांना आशीर्वाद देण्यासाठी उसळला जनसागर

## रुपराव महाराजच्या साक्षीने सर्वांनी मी बुंदिले, म्हणून निवडून आणण्याचा निर्धार रमेश बुंदिले यांच्या प्रचारार्थ रवी राणा यांच्या रोड शो ने दुमदमले शहर




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ अंजनगांव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी. दर्यापूर विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस रिपाई आठवले पिरिपा कवाडे लहूजी शक्ती सेना शेतकरी संघटना व घटक पक्ष राष्ट्रीय युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार रमेश बुंदिले यांच्या प्रचारार्थ अंजनगाव सुर्जी येथे महारॅलीत काढण्यात आली. या महारॅलीतआमदार रवी राणा रमेशभाऊ बुंदीले, सुंदरलाल पटेल, मदन बायस्कर, बाबाराव बरवट, तुळशीरामजी भोंडे, शिवाजी गावंडे, बाबुराव उंबरकर, संजय रोहणकर,अजय देशमुख,उमेश भोंडे, रवी गोळे,विष्णू कुऱ्हाडे, सुभाष कोकाटे,अजय पसारी,संजय नाठ,मीना बुंदीले, लीला डिके,धर्मठोक ताई,संजय टिपरे,विठ्ठल ढोले, नितीन दातीर,प्रभाकर इंगळे समवेत हजारोच्या संख्येने लोक सहभागी झाले.रमेश बुंदिले यांना आशीर्वाद देण्यासाठी या महारॅलीत जनसागर उसळला. अंजनगाव सुर्जी येथील पान अटाई चौकात रवी राणा यांच्या रोड शो ने संपूर्ण शहर दुमदुमले. अंजनगाव सुर्जी मध्ये शहरातून हजारोंच्या संख्येमध्ये आशीर्वाद देण्यासाठी मातृ शक्ती पितृ शक्ती सरसावले. आमदार म्हणून आपल्या साधेपणाने संपूर्ण दर्यापूर मतदारसंघात सर्वांचे आवडते उमेदवार रमेश बुंदिले हे स्वतः इंजिनिअर आहे. सेवानिवृत्त अधिकारी असल्याकारणाने प्रशासकीय सेवेचा दांडगा अनुभव आहे. आमदार म्हणून मंत्रालयात काम करण्याची संपूर्ण माहिती आहे. त्यांच्या विरोधात बाहेरच्या पार्सल आणि धंधेवाला उमेदवार आहे. करिता बाहेरचे पार्सल बाहेरच पाठवायचे. असे दर्यापूर मतदारसंघातील सर्व मतदारांनी ठरवले आहे. भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉ अनिल बोंडे, माजी खासदार नवनीत राणा, आमदार प्रकाश भारसाकळे यांचा देखील उमेदवार रमेश बुंदिले यांना आशीर्वाद आहे. संपूर्ण महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते रमेश बुंदिले यांच्या पाठीशी आहे. भाजप शिवसेना राष्ट्रवादी कॉंग्रेस रिपाई आठवले पिरिपा कवाडे लहूजी शक्ती सेना शेतकरी संघटना व राष्ट्रीय युवा स्वाभिमानचे रवी राणा यांच्या रोड शो ने रमेश बुंदिले यांच्यासाठी महायुतीत नवचैतन्य निर्माण झाले आहे. असे चित्र स्पष्ट दिसून येत आहे. परिणामी विरोधकांचे धाबे दणाणले आहे तर सामान्य नागरिकांमध्येही रमेश बुंदेले बद्दल सहानुभूती दिसून येत आहे.

# लक्ष्मी नगर - सरस्वती नगर - शोभा नगर परिसरात डॉ.सुनील देशमुख यांच्या पदयात्रेला उसळला जनसमुदाय

## भ्रष्टाचार मुक्त व निर्भय अमरावतीकरिता मिळतेय जनतेची साथ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ अमरावती**

महाविकास आघाडी कॉंग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार डॉक्टर सुनील देशमुख यांची लक्ष्मी नगर - सरस्वती नगर - शोभा नगर प्रवीण नगर परिसरामध्ये स्थानिक नागरिकांच्या प्रचंड उपस्थितीत भव्य प्रचार पदयातत्रेचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. सुनील देशमुख यांनी केलेली विकास कामे निस्पृहपने करण्याची शैली व त्यांचे कार्यकाळात अमरावती शहराचा झालेला अभुतपूर्व विकास याचे प्रतिबिंब जनसंमर्थनामधून या पदयात्रांमध्ये प्रतिबिंबित होत आहे. या पदयात्रेला प्रामुख्याने माजी खासदार अनंतरावजी गूढे, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे प्रवक्ते दिलीपरावजी एडतकर माजी महापौर विलास इंगोले, शहराध्यक्ष बबलू शेखावत कॉंग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.लक्ष्मी नगर परिसरातील झेंडा चौक येथून प्रचंड उत्साहात पदयात्रेची सुरुवात करण्यात आली त्यानंतर ही पदयात्रा लक्ष्मी नगरातून मार्गक्रमण करीत पुढे शोभा नगर लक्ष्मी नगर परिसरातील विविध मंदिरांमध्ये गजानन महाराजांचे दर्शन,लहरी बाबा मंदिरात संतांचे दर्शन करून मार्गस्थ झाली.पदभ्रमण करीत विविध ठिकाणी डॉ. सुनील देशमुख यांचे औक्षवन करून माता-भगिनी व ज्येष्ठ मंडळींनी भरभरून आशीर्वाद रुपी पाठिंबा दिला. अमरावती शहराचा खऱ्या अर्थाने कायापालट करण्याचे निर्धारपूर्वक प्रयत्न डॉक्टर सुनील देशमुख यांनी त्यांचे कार्यकाळात केले आहे व उघड्या डोळ्यांनी दिसेल असा विकास त्यांनी प्रयत्नपूर्वक करून दाखवला. इतकेच नव्हे तर भ्रष्टाचार मुक्त प्रशासन व नागरिकांना निर्भय होऊन शहरात वापरण्याचे स्वातंत्र्य कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवून शहर खऱ्या अर्थाने समृद्धीकडे नेण्याचे अभिवचन निवडणुकीच्या निमित्ताने डॉक्टर सुनील देशमुख यांनी जनतेला दिलेले आहे. गेल्या पाच वर्षात अमरावती महापालिकेपासून ते प्रत्येक क्षेत्रात प्रचंड बजबजपुरी झाल्याने संपूर्ण प्रशासनिक कारभार नेपाळल्याचे चित्र निर्माण झालेले आहेत. याला कोण जबाबदार आहे याचा निर्णय या निवडणुकीत नागरिकांना घ्यायचा आहे. आणि याच कारणाने मोठे जनसमर्थन या पदयात्रांच्या माध्यमातून डॉ.सुनील देशमुख यांना मिळत आहे.पुढेही पदयात्रा मुख्य मार्गाने मार्गस्थ होत त्याचा समारोप प्रवीण नगर येथे करण्यात आला. या पदयात्रेला अभूतपूर्व असा प्रतिसाद व जनसमर्थन मिळाले.

# यशोमती ठाकूर विक्रमी मताधिक्याने निवडून येणार

## नागरिकांनी व्यक्त केला विश्वास : आदिवासी नृत्य, पुष्पवृष्टी आणि नागरिकांची भरगच्च उपस्थिती : गावोगावी जंगी स्वागत, प्रचाराला उत्स्फूर्त प्रतिसाद



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

तिवसा विधानसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडी कडून निवडणूक लढवीत असलेल्या कॉंग्रेस पक्षाच्या अधिक उमेदवार यशोमती ठाकूर यांच्या प्रचार दौऱ्याला गावोगावी उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. प्रचार दौऱ्यात यशोमती ठाकूर यांचे आदिवासी नृत्य सादर करून तथा ओवाळून व पुष्पवृष्टी करून नागरिकांकडून जंगी स्वागत करण्यात येत असल्याने त्या मोठ्या मताधिक्याने विजयी होतील असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे.महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवार यशोमती ठाकूर यांच्या प्रचाराने आता चांगलाच घेतल्याचे दिसून येत आहे. त्यांच्या प्रचार यात्रेला गावोगावी नागरिकांनी उस्फुर्त प्रतिसाद देत त्यांचे जंगी स्वागत केले आहे. यशोमती ठाकूर ह्या तिवसा मतदारसंघातून निवडणूक लढवीत आहे. येत्या २० नोव्हेंबर रोजी मतदान असून या निवडणुकीमध्ये त्या मोठ्या मताधिक्याने विजयी होतील असे चित्र तिवसा मतदारसंघात दिसून येत आहे. तिवसा मतदार संघात विविध योजना राबवून यशोमती ठाकूर यांनी विकास केला आहे. विकास कार्य आणि त्यांच्या लोकप्रियतेमुळे त्या चौथ्यांदा पुन्हा निवडून येतील. अशी चर्चा मतदारसंघात आहे. शनिवार ९ नोव्हेंबर रोजी यशोमती ताई यांच्या प्रचार दौऱ्याला सार्सी सातारगाव, वरुडा,दापोरी, करजगाव,जावरा या भागात नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. तर रविवार दहा नोव्हेंबर रोजी पिंगळादेवी, मंगरूळ, शिरजगाव, काटसुर, अडगाव, विचोरी, वाघोली, लेहगाव शिरखेड, सावरखेड, नेरपींगळाई आदी गावांना भेटी देऊन लोकनेत्या यशोमती ठाकूर यांनी आपला प्रचार केला.प्रचारादरम्यान यशोमती ठाकूर यांना नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत अनेक संघटनांचे देखील समर्थन दिले. तिवसा मतदार संघातून यशोमती ठाकूर ह्या विक्रमी मताधिक्याने विजयी होतील असा विश्वास व्यक्त करत नागरिकांनी यशोमती ठाकूर, तुम आगे बढो,हम तुम्हारे साथ है.. अशा जोरदार घोषणा दिल्या.

# बडनेरात खास लोकांचा विकास, सामान्यांना मात्र त्रास

## सुनील खराटे यांचा आरोप : शहरी भागात केला संवाद दौरा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११बडनेरा**

बडनेरा विधानसभा मतदारसंघात एका लोकप्रतिनिधीच्या अवतीभवती असणाऱ्या खास लोकांचा विकास झाला, त्यांची संपत्ती दुप्पट -तिप्पट झाली. मात्र सर्वसामान्य नागरिकांना दररोजच्या जगण्यासाठी त्रास सहन करावा लागत आहे. सामान्यांना न्याय देण्यात व परिसराचा विकास करण्यात येथील लोकप्रतिनिधी कमी पडले आहे. त्यामुळे यावेळी मतदारसंघात परिवर्तन घडवा असे आवाहन बडनेरा विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडी व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार सुनील खराटे यांनी मतदारांसोबत प्रत्यक्ष संवाद साधताना केले.बडनेरा विधानसभा मतदारसंघातील शहरी भाग असलेल्या आंचल विहार ,पार्वती नगर, वल्लभनगर, क्रांती कॉलनी या परिसरात सुनील खराटे यांनी संवाद दौरा करीत मतदारांची भेट घेतली आणि प्रत्यक्ष संवाद साधला. बडनेरा मतदारसंघात गेल्या पंधरा वर्षांमध्ये विकास झाला नाही. शेतकरी, महिला सुरक्षा ,उच्च शिक्षण, उद्योग ,बेरोजगारी अशा अनेक समस्या या भागांमध्ये वर्षानुवर्ष बघावयास मिळत आहे. एखादा मोठा रोजगार देणारा उद्योग देखील या भागामध्ये आमदार आणू शकले नाही. आपल्या क्षेत्राचा विकास करण्याची जबाबदारी ही आमदाराची असते, पण येथे काहीही विकास झाला नाही असे एकंदर चित्र आहे. त्यामुळे या क्षेत्राच्या जनतेची प्रगती झाली नाही हे बघता बडनेरा विधानसभा मतदारसंघांमध्ये विकास करायचा असेल तर परिवर्तन घडवून महाविकास आघाडीला मतदान करा असे आवाहन उमेदवार सुनील खराटे यांनी यावेळी केले.क्रांती कॉलनी येथील संत गजानन महाराज मंदिरात पूजा करीत व माता टेकवित सुनील खराटे यांनी आपल्या संवाद दौऱ्यास प्रारंभ केला. आचल विहार, पार्वती नगर ,पार्वती नगर नंबर एक ,वल्लभनगर, क्रांती कॉलनी या परिसरातून मार्गक्रमण करीत या संवाद दौऱ्याची सांगता झाली.सदर दौऱ्यात वृद्ध, तरुण ,महिला आदी मतदारांनी सुनील खराटे यांना पाठीशी उभे राहण्याबाबत आश्वस्त करीत निवडून आणण्याची ग्वाही दिली.सदर संवाद दौऱ्यामध्ये सागर देशमुख, श्याम धाने पाटील, राजा बांगडे,संजय श्रीराव, राजेंद्र शर्मा, बाळासाहेब अंबाडकर, सचिन ठाकरे यांच्यासह शेकडो शिवसैनिक व घटक पक्षाचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.